रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३१० | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## गोळीबार प्रकरणाचे रायगड कनेक्शन

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या घराजवळ गोळीबार करण्यासाठी हल्लेखोर आरोपींनी वापरलेली बाईक ही रायगडमधील असल्याची माहिती पोलीस तपासात पुढे आली आहे. हल्लेखोरांचे सीसीटीव्ही फूटेज समोर आले असून, त्यांचा शोध सुरू आहे. हल्लेखोराचा फोटो समोर आला आहे. सलमान खानच्या घरावर गोळीबार करण्याआधी हल्लेखोरांनी बाईक खरेदी केली होती. या दोन्ही आरोपींनी रायगड जिल्ह्यातून जुनी बाईक खरेदी केली होती, असे तपासात समोर आले आहे. ही सेकंड हँड खरेदी केलेली बाईक घेऊन आरोपी मुंबईत दाखल झाले आणि गोळीबार केला.


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १६ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹


## आज आघाडीच्या कार्यकर्त्यांची सभा

**अलिबाग :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेतेमंडळींच्या प्रचार दौऱ्यांना प्रारंभ झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र गटाचे प्रमुख शरद पवार येत्या २३ एप्रिल रोजी माणगावमध्ये येणार आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्ष आणि इंडिया आघाडीतील सर्व पक्षातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची सभा उद्या मंगळवारी (दि. १६) सकाळी १० वाजता मोरबा येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेकापचे माणगाव तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी केले आहे.





उन्हाळ्याची सुट्टी AI शी गट्टी
चला करूया MS-CIT!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.


**आजचा अग्रलेख**
**असली आणि नकली**

## ज्याची जशी कुवत, तसे मुखातून शब्द बाहेर पडतात
# विरोधकांची टीका तथ्यहीन
### इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीतेंचा टोला

| अलिबाग | प्रतिनिधी |

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधक माझ्यावर वेगवेगळे आरोप, टीका करीत आहेत. कोणी काय उपमा द्यायची हे त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. ज्याची जशी कुवत असते, तसे त्याच्या मुखातून शब्द बाहेर पडतात. त्यामुळे विरोधकांच्या टीकेला गांभीर्याने घेण्याची गरज नाही, असा टोला इंडिया आघाडीचे उमेदवार तथा माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना लगावला.

इंडिया आघाडीमधील घटक पक्षातील शेकापचे नेते आ. जयंत पाटील, काँग्रेसचे ॲड. प्रवीण ठाकूर, आ. भास्कर जाधव, माजी आ. अनिल तटकरे पान २ वर



### ‘मविआच्या उमेदवारांना विजयी करा’



देशात सध्या संविधान व लोकशाहीविरोधी वातावरण निर्माण होऊ लागले आहे. हुकूमशाहीकडे देशाची वाटचाल आहे. त्यामुळे या निवडणुकीत संविधान व लोकशाहीविरोधी तसेच हुकूमशाही पद्धतीच्या राजवटीला उलथवून टाकण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी मतदारांसह कार्यकर्त्यांना केले.

भारतीय शेतकरी कामगार पक्ष हा इंडिया आघाडीचा अधिकृत घटक पक्ष आहे. पक्षाचा सरचिटणीस म्हणून मी पान २ वर



### गीतेसाहेबांची ढाल म्हणून उभा आहे : आ. जाधव

रायगड लोकसभा निवडणुकीत अनंत गीते यांना निवडून आणण्यासाठी छातीचा कोट करून गुहागर विधानसभा मतदारसंघात, संपूर्ण कोकणात गीते यांची ढाल बनून उभा आहे. किमान ५० ते ६० हजार मताधिक्य गीतेंना मिळवून देण्याचा प्रयत्न करणार, असे प्रतिपादन आ. भास्कर जाधव यांनी केले.

जाधव पुढे म्हणाले, देशात सुशिक्षित लोकांचे प्रमाण फार मोठे झाले आहे. विरोधकांनी एकाच नावाचे अनेक उमेदवार उभे केले आहेत. ते कोणत्या जमान्यात आहेत, तेच कळत नाही. निवडणुकीत निशाणीचा प्रचार केला जातो, नावाचा नाही. याचे भान विरोधकांना असावे. नावाचे उमेदवार पान २ वर

# पाच उमेदवारी अर्ज दाखल
### अनंत गीते नाम साधर्म्य असणारे दोघे निवडणुकीच्या रिंगणात

| रायगड | खास प्रतिनिधी |

लोकसभा मतदारसंघासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या सोमवारी दुसऱ्या दिवशी पाच उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले. इंडिया आघाडीचे शिवसेना ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार अनंत गीते यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यातील विशेष बाब म्हणजे, अनंत गीते नाम साधर्म्य असणाऱ्या अन्य दोन जणांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. ओरिजनल अनंत गीते यांची मशाल निशाणी मतदारांच्या मनामनामध्ये कोरली आहे. त्यामुळे डमी उमेदवाराची खेळी यशस्वी होणार नसल्याचे दिसून येते.

मतदानाच्या तिसऱ्या टप्प्यात रायगड लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी मतदान होणार आहे. १२ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली होती. मात्र, पहिल्या दिवशी एकाही उमेदवारने उमेदवारी अर्ज दाखल केला नव्हता. १६ जणांनी जिल्हाधिकारी कार्यालयातून २४ उमेदवारी अर्ज खरेदी केले होते.

रायगड लोकसभा मतदारसंघामध्ये इंडिया आघाडीचे शिवसेना (ठाकरे गट) पान २ वर

**अनंत बाळोजी गीते (अपक्ष, १ अर्ज), अनंत पद्मा गीते (अपक्ष, १ अर्ज), अनंत गंगाराम गीते (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, १+ ३ अर्ज), नितीन जगन्नाथ मयेकर अपक्ष (१ अर्ज), आस्वाद जयदास पाटील अपक्ष (१ अर्ज) दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली.**

**वेधक**

### अलिबागेत हलक्या सरी

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यामध्ये येत्या पुढील तीन ते चार तासांमध्ये काही ठिकाणी अवकाळी पाऊस पडणार असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. दरम्यान, सोमवारी रात्री आठच्या सुमारास अलिबाग तालुक्यात काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. दरम्यान, काही भागात वादळी वाऱ्यासह मेघगर्जना, विजांचा कडकडाट होणार असून, काही ठिकाणी हलक्या सरी पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी घरातून बाहेर पडताना काळजी घ्यावी, असे आवाहन रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

### निकालाची तारीख ठरली?

**मुंबई :** संपूर्ण राज्यभरातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना प्रतीक्षा लागून राहिलेला निकाल लवकरच जाहीर होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून देण्यात आली. त्यानुसार बारावीचा निकाल मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. सध्या देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, निवडणुकांचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. त्याअगोदर दहावीचा निकाल लावण्याची शक्यता असून, १, २ आणि ३ जून यापैकी एका तारखेला निकाल जाहीर होऊ शकतो. दहावी आणि बारावीच्या परीक्षेला बसलेले विद्यार्थी mahresult.nic.in आणि mahahsscboard.in वर निकाल पाहू शकतात, असे बोर्डाकडून सांगण्यात आले आहे.

# लीना गरड यांच्या हाती भगवा



| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत कॉलनी फोरमच्या अध्यक्ष लीना गरड यांनी सोमवारी (दि. १५) शिवसेनेत प्रवेश केला. लीना गरड या पनवेल पालिकेच्या माजी नगरसेविका असून, दुहेरी मालमत्ता कराविरोधात आक्रमक भूमिका घेत त्या पालिकेतील सत्ताधारी पक्ष असलेल्या भाजपापासून दूर झाल्या होत्या. दादर येथील शिवसेना भावनात पार पडलेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यावेळी शिवसेना (उबाठा) गटाचे पनवेलमधील कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गरड यांच्यासोबत पान २ वर

### मालमत्ता करातून पनवेलकरांची सुटका?
**उद्धव ठाकरेंची घोषणा**

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेलमध्ये दुप्पटीने मालमत्ता कर आकारला जातोय. मालमत्ता कर भरु नये, असं आमचं म्हणणं नाही. परंतु अन्यायकारक कर लादू नयेत. एकीकडे मनपाचा हा कर, तर दुसरीकडे सीडकोकडून करवसुली सुरुच आहे. ज्या सुविधाच मिळत नाहीत, त्यांचा कर का घेता, असा सवाल ठाकरेंनी उपस्थित केला.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, मी मुंबईकरांना एक वचन दिलं होतं. ५०० स्केअर फुटांच्या घरांचा कर माफ करण्याचं. ते वचन आम्ही पूर्ण केलं. आता आमचं सरकार राज्यात आणि केंद्रात आल्यानंतर या दुहेरी करातून पान २ वर

# M.O.D.I. करणार सुनील तटकरेंचा पराभव

मराठा | ओबीसी | दलित | इस्लाम




**आविष्कार देसाई**

| रायगड |

लोकसभा निवडणूकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नावाचे ढोले बडवून निवडणूक जिंकण्याची रणनिती आखण्यात आली आहे. मात्र, रायगड लोकसभा मतदार संघात मोदीच (MODI) महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांचा पराभव करणार आहेत. मोदी फॅक्टर हा तटकरेंच्या विरोधात रणांगणात उतरल्याने त्यांची झोप उडाली असल्याचे चित्र आहे.

तुम्ही म्हणाल काय सांगता राव.... मोदींना तिसऱ्यांदा प्रधानमंत्री करुन हॅट्रीक साधायची आहे. यासाठी भाजपाने ४०० पारचा नारा दिला आहे आणि मग तेच आपल्या उमेदवाराला निवडणूकीत कसे काय पाडतील. हे कसे काय शक्य आहे. तुमचा प्रश्न माझ्या लक्षात आला आहे. खरे तर मोदी काय आहे हे तुम्ही आधी समजून घ्या म्हणजे तुम्हाला कळेल. एम म्हणजे मराठा मतदार, ओ म्हणजे ओबीसी, डी म्हणजे दलित आणि आय म्हणजे इस्लामीक (इस्लाम मानणारे मुस्लिम) असा त्याचा सरळ अर्थ आहे. हे सर्व घटक विरोधात एकवटले आहेत. त्याचा फटका हा सुनील तटकरे यांना बसणार असल्याचे दिसते.

रायगड लोकसभा मतदारसंघामध्ये इंडिया आघाडीचे शिवसेनेचे अनंत गीते आणि महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) सुनील तटकरे यांच्यात प्रमुख लढत होत आहे. मतदारसंघामध्ये मराठा, ओबीसी, दलित आणि मुस्लिम मतांचा चांगलाच प्रभाव आहे. २०१४ च्या निवडणुकीत हे सर्व फॅक्टर तटकरेंच्या विरोधात गेल्याने तटकरेंचा पराभव झाला होता, पान २ वर

**मोदी फॅक्टरमधील जातीय समीकरण**
(रायगड लोकसभा मतदारसंघ)

**एकूण मतदार-१६,५३,९३५**
**मराठा- ४,६३,३०३ (२०%)**
**ओबीसी-१२,०४,५८७ (५२%)**
**दलित-३,९३,८०६ (१७%)**
**मुस्लिम-२,३१,६९६ (१०%)**

# शिक्षणाधिकाऱ्यांच्या निर्णयाकडे लक्ष
### आरसीएफ शाळेसाठी पालकांसह विद्यार्थीदेखील सरसावले

| अलिबाग | प्रतिनिधी |

कुरुळ येथील आरसीएफ शाळेचा प्रश्न सोडविण्यासाठी गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांनी सोमवारी (दि.१५) शाळेत जाऊन पालक व विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. शाळा सुरु ठेवण्याबाबतच्या पालक व विद्यार्थ्यांच्या भूमिकेला दुजोरा देत शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविला जाईल, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे आरसीएफ शाळेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी शिक्षणाधिकारी काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथील आरसीएफ कर्मचारी वसाहतीच्या परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचलित आरसीएफ शाळा सुरु आहे. शाळेबरोबरच महाविद्यालयदेखील या ठिकाणी आहे. अलिबागसह परिसरातील ग्रामीण भागातील एक हजार ३००हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी या शाळा-महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना साठहून अधिक शिक्षक घडविण्याचे काम करीत आहेत.




> आरसीएफ शाळेच्या प्रश्नाबाबत माहिती घेण्यासाठी बैठकीचे आयोजन केले होते. कंपनीसह डेक्कन एज्युकेशन सोसायटीमधील अधिकारी व पदाधिकाऱ्यांना पाचारण केले होते. मात्र, ही मंडळी हजर राहिली नाही. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांचे मत लिहून घेतले. त्याचा अहवाल शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठविला जाईल. शाळा सुरु राहिली पाहिजे, ही आमची भूमिका आहे.
> – कृष्णा पिंगळा, गटशिक्षणाधिकारी

मात्र, अचानक ही शाळा चालविण्यास समर्थ नसल्याचे डेक्कन एज्युकेशन सोसायटीने आरसीएफ कंपनीला पत्र दिले असल्याची माहिती पान २ वर

**चेक बाऊन्सप्रकरणी**
### राष्ट्रवादीच्या जिल्हा सरचिटणीसांना सहा महिन्यांची सजा

| पेण | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) सरचिटणीस गंगाधर धर्माजी पाटील, रा.बोर्झे, ता. पेण यांना सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा प्रथम वर्ग न्यायाधीश पेण यांनी सुनावली आहे. याविषयी सविस्तर वृत्त असे की, गंगाधर पाटील यांना चेक बाऊन्सप्रकरणी दोषी ठरविण्यात आले.

आरोपी गंगाधर धर्माजी पाटील यांनी धनादेश क्रमांक ०११५९५, जनता सहकारी बँक, पेण शाखा धनादेशाची रक्कम रुपये ३ लाख ३० हजार रुपये हा अनादरीत झाल्याकरिता (चेक बाऊन्स) रक्कम रुपये ४ लाख ४५ पान २ वर

# एसटी कर्मचाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न
### वरिष्ठांकडून अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचा आरोप

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग एसटी बस आगारातील कर्मचाऱ्याने शनिवारी रात्री आगारातच गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. ड्युटी लावणाऱ्या अधिकाऱ्यांकडून चांगली वागणूक मिळत नसल्याने त्याने हा प्रकार केल्याची चर्चा सध्या जोरात सुरु आहे. यापूर्वीदेखील असाच प्रकार मुरुड एसटी बस आगारात झाला.

ड्युटी लावणाऱ्या अधिकाऱ्यांकडून योग्य वागणूक मिळत नसल्याने मुरुड आगारातील चालकाने मागील दोन महिन्यांपूर्वी विषारी औषध खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेनंतर शनिवारी (दि.१३) अलिबाग पान २ वर






## बळिराजासाठी खुशखबर | यंदा ‘तो’ चांगला बरसणार

| मुंबई | प्रतिनिधी |

यंदा भारतात सरासरीहून अधिक मान्सून राहण्याची शक्यता आहे, असे भारतीय हवामान विभागाने सोमवारी (दि. १५) जाहीर केले. जून ते सप्टेंबर महिन्यांमध्ये सामान्य पावसाच्या तुलनेत सरासरी १०६ टक्के पाऊस होण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने जाहीर केले. त्यामुळे पहिल्या अंदाजाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

दुष्काळ, तापमानवाढ, गारपीट, पूर असे अनेक हवामान बदल घडत असताना देशात यंदा पाऊस कसा असणार याविषयी शेतकऱ्यांसह सामान्य नागरिकांना हवामान विभागाच्या अहवालाची प्रतीक्षा होती. सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्याने महाराष्ट्रात आशादायी परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतात साधारणपणे १ जूनच्या सुमारास केरळच्या दक्षिणेकडील टोकावर मान्सूनला सुरुवात होते.




### पाऊस मोजण्याची श्रेणी

**यंदाच्या हंगामात सरासरीच्या १०६ टक्के पाऊस पडणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. हवामान विभागाने पावसाच्या प्रमाणाच्या अशा पाच श्रेणी ठरवल्या आहेत. त्यानुसार ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस म्हणजे अपुरा पाऊस समजला जातो. दुसऱ्या श्रेणीत ९० ते ९५ टक्के म्हणजे सरासरीपेक्षा कमी पाऊस, तर तिसऱ्या श्रेणीत ९६ ते १०४ टक्के म्हणजे सामान्य सरासरी इतका पाऊस समजला जातो. पुढील दोन श्रेणी सरासरीपेक्षा अधिक म्हणजे १०५ ते ११० टक्के आणि ११० टक्क्यांच्या पुढे अधिक पाऊस म्हणजे सर्वाधिक पाऊस समजला जातो. यंदाच्या हंगामात तिसऱ्या श्रेणीतील पावसाचे भाकित करण्यात आले आहे.**

सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पाऊस माघार घेतो. यावर्षी ८७ सेंटीमीटरच्या दीर्घकालीन सरासरीच्या एकूण १०६ टक्के पाऊस अपेक्षित असल्याचे भूविज्ञान मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

सध्या भूमध्यरेखीय प्रशांत महासागरीय क्षेत्रात अल निनो मध्यम स्थितीवर सक्रीय असून, जलवायू मॉडलच्या पूर्वानुमानानुसार पावसाळ्याच्या सुरुवातीला अल निनोची स्थिती तटस्थ होण्याचा अंदाज आहे. सरासरीहून अधिक पावसाची शक्यता यंदा देशात वायव्य, पूर्व, इशान्य भाग वगळता उर्वरित भागांमध्ये सामान्य पावसाच्या तुलनेत अधिक पाऊस होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

### मान्सून वेळेवर दाखल होणार

**स्कायमेटच्या अंदाजानुसार, जून महिन्यापर्यंत अल निनोचं ला निनामध्ये रूपांतर होईल. यामुळे मान्सून वेळेवर दाखल होऊन चांगला होईल, अशी शक्यता आहे. गेल्या वर्षी २०२३ मध्ये कमकुवत मान्सून पाहायला मिळाला. मात्र, यंदा मान्सून सामान्य राहण्याची शक्यता आहे. जून ते ऑगस्ट या कालावधीत ला निना परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे यंदाचा मान्सूनचा पाऊस गेल्या वर्षीपेक्षा चांगला असू शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१६ एप्रिल
१) श्री. शरद गोविंद देशमुख
पिंपळभाट, अलिबाग, १६-४-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**आयुषी व रवी वोरा,**
**लग्नदिनानिमित्त, अहमदाबाद**

# नेरळची पाणीटंचाई कायम

## भूमीपूजन होऊन वर्ष लोटले; एकाही जलकुंभाचे बांधकाम नाही

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायत हद्दीसाठी ४० कोटींची नळपाणी योजना यांचे भूमीपूजन जून २०२३मध्ये झाले होते. मात्र, या नळपाणी योजनेच्या कामाचा अवधी केवळ सहा महिने शिल्लक राहिले आहेत. परंतु, नळपाणी योजनेमधून बांधण्यात येणारे चारही जलकुंभांचे काम जेमतेम पाच टक्के झाले आहे. दरम्यान, नेरळ नळपाणी योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीकडून कोणत्याही प्रकारचे काम पुढे जात नसल्याने नेरळ गावामध्ये आलेली पाणीटंचाई किमान वर्षभर राहण्याची शक्यता आहे.

नेरळ ग्रामपंचायत भागासाठी जलजीवन मिशनमधून ४० कोटींची नळपाणी योजना मंजूर झाली आहे. या नळपाणी योजनेचे भूमीपूजन आमदार महेंद्र थोरवे आणि प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते जून २०२३ रोजी करण्यात आले होते. या योजनेच्या कामासाठी दीड वर्षाची मुदत असून, ती संपण्यास आता फक्त सहा महिन्यांचा कालावधी शिल्लक



आहे. या योजनेमध्ये चार ठिकाणी जलकुंभ नव्याने बांधले जाणार असून, जुन्या नळपाणी योजनेमधील मोहाची वाडी येथील एक जलकुंभ नवीन योजनेतदेखील वापरात राहणार आहे. योजनेचे बांधकाम सुरू होऊन किमान वर्षे पूर्ण झाले आहे. मात्र, या योजनेमधील एकाही जलकुंभाचे बांधकाम पूर्ण झालेले नाही. नेरळ प्रादेशिक नळपाणी योजनेत जलकुंभ बांधले जाणार असलेल्या ठिकाणी टेप आळी येथील बांधकाम वनजमिनीमध्ये वादात सापडले आहे. तर, आनंद वाडी येथील जलकुंभ बांधकामासाठी जमीन देणाऱ्या जमीन मालकाने वर्षभर कामे सुरू केली जात नसल्याने आता जमीन देण्यासाठी असहमती दर्शवली आहे. त्याचवेळी जुम्मापट्टी येथे जलकुंभ बांधण्यासाठी जमीन देणाऱ्या महिला शेतकऱ्यांनीदेखील आपल्या जमिनीवर कोणतेही अतिक्रमण होऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली आहे.

नेरळ प्रादेशिक नळपाणी योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून पूर्ण केले जाणार आहे. या योजनेत मोहाची वाडी येथे साडेबारा लाख लीटर तसेच आनंद वाडी, जुम्मापट्टी आणि टेपआळी अशा चार ठिकाणी जलकुंभ उभारले जाणार आहेत. नवीन योजनेच्या कामाचे भूमीपूजन करताना जून २०२३ मध्ये जुन्या भुस्तर पाण्याची टाकी तोडण्यात आली.त्याच ठिकाणी साडेबारा लाख लीटर क्षमतेचे नवीन जलकुंभ बांधण्यास सुरुवात झाली. मात्र, खोदकामाशिवाय तेथील जलकुंभाचे काम पुढे सरकू शकले नाही. वर्ष लोटले तरी या मोहाची वाडीमधील सर्वात जास्त लीटर क्षमतेच्या जलकुंभ बांधण्याचे काम एक टक्कादेखील पुढे लोटले नाही. त्याचा परिणाम नेरळ गावात जून २०२३ मध्ये सुरू असलेली पाणीटंचाई एक वर्षानंतरदेखील कायम आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात विजेचा लपंडाव

## ■ ऐन उन्हाळ्यात ग्राहक उष्म्याने कासावीस

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

मागील तीन-चार दिवसांपासून श्रीवर्धन शहरासह तालुक्यामध्ये विजेचा लपंडाव चालू आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर पूर्ववत होण्यास कमीत कमी अर्धा ते पाऊण तासाचा वेळ लागत आहे. शनिवारी व रविवारी श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची खूप मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. याच वेळेला, म्हणजे शनिवारपासून श्रीवर्धन शहरासह तालुक्यामध्ये वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

श्रीवर्धन येथील मोजक्याच हॉटेलमध्ये जनरेटरची सुविधा उपलब्ध आहे. अन्य ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर वातानुकूलित यंत्रणादेखील बंद पडतात. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येते. तालुक्यातील श्रीवर्धन शहर, दिवेआगर व हरिहरेश्वर या ठिकाणी पर्यटकांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात असते. पावसाळ्यातदेखील वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार वारंवार घडत असतो, त्यामुळे या ठिकाणी भूमीगत विद्युत वाहिन्या टाकण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. श्रीवर्धन शहरातसुद्धा भूमीगत विद्युत वाहिन्या टाकलेल्या आहेत. परंतु, त्याचा वापर अद्याप झालेला नाही. तरी महावितरणने भूमीगत विद्युत वाहिन्या लवकरात लवकर कार्यान्वित कराव्या, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

# माथेरानमध्ये कचऱ्याचे साम्राज्य

## ■ नगरपरिषदेचे अक्षम्य दुर्लक्ष

**। माथेरान । वार्ताहर ।**

नगरपरिषदेच्या माध्यमातून दरवर्षी लाखो रुपयांची उधळण केवळ स्वच्छतेवर केली जात आहे. परंतु, एकदा का याबाबत टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली की ठेकेदारसुद्धा काही लक्ष देत नसून, दर महिन्याला कामाची बिले घेण्यासाठी आतुर असतात. घनकचरा व्यवस्थापनासाठी तर काही कोटींच्या घरात ठेका दिला जातो; परंतु त्याप्रमाणे कामे पूर्ण केली जात नाहीत, त्यामुळे माथेरानमध्ये कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे, असा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

संबंधित ठेकेदाराला वेठीस धरून काही मंडळी आपले उखळ पांढरे करण्यात व्यस्त दिसतात. नेमून दिलेली कामे योग्य पद्धतीने केली जात आहेत किंवा नाही यावर अंकुश ठेवण्यासाठी नगरपरिषदेचा अधिकारी वर्ग हतबल दिसत आहे. मागील काळात नगरपरिषदेने अनेकदा स्वच्छता अभियानात पारितोषिक प्राप्त केलेल्या या गावात सद्यःस्थितीत स्वच्छता लोप पावत चालली आहे. विविध पॉईंट्स त्याचप्रमाणे महत्त्वाच्या ठिकाणी प्लास्टिक बाटल्या तसेच रॅपर्स जंगलात इतस्ततः पडलेले असते. सर्वच



**नगरपरिषदेने दरवर्षी घनकचरा व्यवस्थापन ठेका संबंधित ठेकेदाराला देऊन एकप्रकारे ठेकेदाराला आणि त्यावर अवलंबून असणाऱ्या काही मंडळींना पोसण्यासाठी हा ठेका काढला जातो की काय? त्यापेक्षा एकवेळ येथील स्वच्छतादूत म्हणून कायम निःस्वार्थीपणे स्वच्छता मोहीम राबवितात अशांना ही कामे दिल्यास नगरपरिषदेची मोठ्या प्रमाणावर आर्थिक बचत होऊ शकते. त्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.**

भागात कचराकुंड्या नसल्याने नाईलाजाने पर्यटक आपल्याजवळील प्लास्टिक कचरा जंगलात टाकत असतात. इथले पर्यावरण अबाधित राहण्यासाठी स्वच्छता राखणे खूपच गरजेचे आहे, त्यासाठी नगरपरिषदेने लक्ष केंद्रित केल्यास इथली वनराई आणि निसर्ग सौंदर्य कायमस्वरूपी हरित राहील, असे नागरिकांमधून बोलले जात आहे.

## मोबाईलचोरांना ठोकल्या बेड्या

**पनवेल :** खारघर सेक्टर १४ येथील मशीदजवळील पाथवर गैबिसहाब इब्राहिम या मोबाईलमध्ये युट्यूब व्हिडीओ पाहात उभा असताना दोन अज्ञात इसमांनी स्कुटीवरून येऊन इब्राहिमच्या हातातील वन प्लस कंपनीचा महागडा मोबाईल खेचून सेक्टर १९ च्या दिशेने पसार झाले. याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करताच चोरट्यांचा तपास पोलिसांनी सुरू केला.

खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश जाधव, उपनिरीक्षक ज्ञानोबा धुळगंडे व गुन्हे प्रकटीकरण पथक यांच्या प्रयत्नाने आरोपींना २४ तासांत खारघर हद्दीतून ताब्यात घेतले. यातील एक आरोपी ३० वर्षांचा असून, दुसरा आरोपी २५ वर्षांचा आहे. आरोपींची चौकशी केली असता ते सराईत गुन्हेगार असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

# पोश्री नदीवरील धरण लालफितीत?

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पोश्री नदीवर मोठे धरण बांधण्याचे कोकण पाटबंधारे विभागाचे नियोजन आहे. या धरणामुळे तीन तालुक्यांतील साडेतीन हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आणली जाणार आहे. तब्बल पाच किलोमीटर लांबीचा बांध घातला जाणार आहे. दरम्यान, या धरणाचे जी जमीन बाधित होणार आहे, त्यातील अर्ध्याहून अधिक जमीन स्थानिक शेतकऱ्यांची तर एक हजार हेक्टर जमीन वनविभागाची आहे आणि त्यामुळे धरण बांधण्यास शेतकऱ्यांचा विरोध आणि वनजमीन मिळविण्यासाठी कसरत करावी लागत असल्याने वनजमिनीमुळे धरण या भागात होण्याची शक्यता कमीच आहे. तसेच हे धरणदेखील लालफितीत अडकून पडण्याची शक्यता आहे.




बोरगाव आणि कुरुंग गावाच्या मागे असलेल्या दोन मोठ्या टेकडीमधील पाच किलोमीटर लांबीचा बांध बांधला जाणार आहे. या धरणामुळे बोरगाव, उंबरखांड आणि चई अशा तीन गावांचे स्थलांतर करावे लागणार आहे. धरणाचा मुख्य जलाशय तसेच मातीच्या बांधासाठी दोन हजारांहून अधिक हेक्टर जमीन लागणार आहे. त्या भागात वनजमीनदेखील मोठ्या प्रमाणात असून, साधारण हजार हेक्टर वनजमीन या धरणाच्या बाधित क्षेत्रात जाणार आहे.त्यामुळे धरणासाठी जमीन मिळेल असा विश्वास कोकण पाटबंधारे विभागाला आहे.मात्र वन विभागदेखील सहजासहजी जमीन देत नसल्याची कर्जत तालुक्यात अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे कर्जत तालुक्यात धरण बांधून ठाणे जिल्ह्यात पाणी नेण्याचे स्वप्न बघणाऱ्या कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांना आहे. मात्र, कर्जत तालुक्यातील ज्या पोश्री नदीवर बांध घालून धरण बांधण्याची तयारी चालविली आहे. मात्र, वनजमीन मिळविण्यासाठी कर्जत तालुक्यातील अनेक प्रकल्प प्रलंबित आहेत. त्यामुळे बोरगाव येथे होणारे प्रस्तावित धरण हे वनजमिनीच्या अडचणीमुळे बासनात गुंडाळले जाण्याची शक्यता आहे.

कर्जत तालुक्यातून पुणे जिल्ह्यात जाणारा उरण-पनवेल-नेरळ-कशेळे मंचर या घाट मार्ग रस्त्याचे काम केवळ पाच किलोमीटर लांबीचा रस्ता वन विभाग यांच्याकडून दहा वर्षांपासून अडवून ठेवला आहे.

## राम जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**पनवेल :** ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज तथा श्री चैतन्य गगनगिरी महाराज यांच्या कृपेने श्रीराम सामाजिक विकास मंडळाच्यावतीने श्रीराम जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामुदायिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. श्रीराम सामाजिक विकास मंडळ, कळंबोली यांनी हा सोहळा आयोजित केला असून, हा सोहळा श्री राम मंदिर, एल.आय.जी.-२, सेक्टर-१, कळंबोली येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्याची सांगता १७ एप्रिल रोजी होणार आहे. अधिक माहितीसाठी राम मंदिर जीर्णोध्दार कमिटी अध्यक्ष संतोष मोकल, उपाध्यक्ष सचिन देशमुख, यांच्याशी संपर्क साधावा.

# पाम बीचलगत कांदळवनात डेब्रिजचे भराव

**। उरण । वार्ताहर ।**

पामबीच मार्गावरील बॅरिकेड्स तोडून लगतच्या खारफुटीवर डेब्रिज टाकण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. विशेष म्हणजे सीवूड्स येथील चाणक्य तलावाचे अस्तित्वसुद्धा धोक्यात आले आहे. या परिसरात दिवसाढवळ्या डेब्रिजच्या गाड्या रिकाम्या केल्या जात असल्याने संबंधित विभागाच्या सुस्त आणि उदासीन कारभाराविषयी पर्यावरणवाद्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. यासंदर्भात वाढत्या तक्रारीची दखल घेत खारफुटी कक्षाच्या अधिकार्यांनी गेल्या आठवड्यात या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली.

नवी मुंबई सीवूड्स येथील चाणक्य तलाव संरक्षित करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने सिडको आणि महापालिकेला दिले आहेत. त्यासाठी तलावाभोवती कुंपण घालण्याचे आदेश दिले आहेत. संबंधित विभागाकडून त्याकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. विशेष म्हणजे, पामबीच मार्गालगतचे बॅरिकेड्स तोडण्यात आले आहेत. त्यामुळे डेब्रिजने भरलेले डंपर आत जाणे सोपे झाले आहे. चाणक्य तलाव आणि त्याच्या आजूबाजूचे खारफुटीचे क्षेत्र सिडकोच्या आधिपत्याखाली येते. या परिसरातील सुमारे ३२ हेक्टर क्षेत्र बेकायदेशीरपणे ताब्यात घेऊन तेथील तलाव बुजवून त्या ठिकाणी टोलेजंग इमारती बांधण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप पर्यावरणवाद्यांनी केला आहे. याविरोधात निसर्गप्रेमींनी मागील चार महिन्यांपासून साप्ताहिक आंदोलन छेडले आहे.

## श्रीराम पालखी सोहळ्याचे आयोजन

**नागोठणे :** नागोठण्यातील जोगेश्वरी नगर (गावठाण) येथील श्रीराम मंदिरात रामनवमीनिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांची सुरुवात सकाळी ९ ते ११ यादरम्यान महापूजेने होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ ते १२ दरम्यान श्रीराम जन्म सोहळा संपन्न झाल्यानंतर दुपारी ३ ते रात्री ८ या वेळेत संपूर्ण जोगेश्वरी नगर भागात श्रीराम पालखी सोहळा संपन्न होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने या पालखी सोहळ्याचा समारोप होणार आहे.

**पान १ वरून**

## विरोधकांची टीका तथ्यहीन

यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. १५) उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी अनंत गीते म्हणाले की, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी माझी अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. त्याच वेळेला इंडिया आघाडीने माझ्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले. अन्य कोणी माझ्या नावाने अर्ज दाखल केला आहे, त्याची दखल घेण्याची अजिबात गरज नाही. निवडणूक ही स्वच्छ वातावरण होण्याची आवश्यकता आहे. शेवटी निर्णय हा मतदार, जनता करणार आहे. मतदारांचा निर्णय अंतिम राहणार आहे. ज्यांना राजकारण करायचे आहे, त्यांना राजकारण करू द्या, त्यांच्याशी काही देणे-घेणे नाही.

शेवटची सभा अलिबागमध्ये पाच तारखेला होणार आहे. यावेळी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक नेते मंडळींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याअगोदर शिवसेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखालीदेखील सभा होणार असल्याचे अनंत गीते यांनी सांगितले.

राज्यात सुरु असलेल्या गलिच्छ राजकारणाविरोधात ही लढाई आहे. देशात सुरु असलेली हुकूमशाही रोखण्यासाठी या निवडणुकीला सामोरे जात आहे. मोदी सरकारच्या मनमानी कारभाराबाबत जनतेमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. या निवडणुकीत भाजपविरोधात असलेली चीड मतदार मतदानातून दाखविणार असा विश्वासही गीतेंनी व्यक्त केला.

## ‘मविआच्या उमेदवारांना विजयी करा’

**स्वतः इंडिया आघाडीमध्ये पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. इंडिया आघाडीतील महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या पक्षांच्या सहभागाने महाविकास आघाडी लोकसभा निवडणूक लढवित आहे. महाविकास आघाडीला शेतकरी कामगार पक्षाचा सक्रीय पाठिंबा आहे. ही निवडणूक हुकूमशाही विरुध्द लोकशाही आणि संविधान वाचविण्यासाठी आहे. त्यामुळे या निवडणुकीत भाजपप्रणित महायुतीचा पराभव घडवून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन आ. जयंत पाटील यांनी केले आहे. संयुक्त प्रचार सभेत सहभागी व्हावे, असेदेखील त्यांनी सांगितले आहे.**

## लीना गरड यांच्या हाती भगवा

कॉलनी फोरमच्या कामोठे, खारघर तसेच पनवेलमधील असंख्य कार्यकर्त्यांनीदेखील उबाठा गटात प्रवेश केल्याने पनवेलमध्ये उबाठा गटाची ताकद वाढणार असून, आगामी लोकसभा निवडणुकीत याचा फायदा महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना होण्याची शक्यता आहे. पक्षप्रवेश सोहळ्यावेळी मावळ लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील, उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत, पनवेल विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, खारघरमधील पदाधिकारी नंदू वारुंगसे उपस्थित होते.

## मालमत्ता करातून पनवेलकरांची सुटका?

पनवेलकरांची मुक्तता केली जाईल.

मावळ मतदारसंघामध्ये शिवसेनेची ताकद आहे. आता नवीन ताकद आपल्यासोबत जोडली जातेय. येत्या निवडणुकीत भाजप सत्तेत येणार नाही. त्यामुळे सर्वांनी ताकदीने महाआघाडीसोबत उभं राहावंफ्र असं आवाहन उद्धव ठाकरेंनी यावेळी बोलताना केलं.

मनसे पदाधिकाऱ्यांचा ठाकरे गटात प्रवेश

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी येत्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला पाठिंबा दिला आहे. त्यांच्या या भूमिकेनंतर मनसेला गळती लागल्याचं चित्र दिसून येतंय. मनसेचे कार्यकर्ते या-ना त्या पक्षामध्ये प्रवेश करताना दिसून येत आहेत. पनवेलमधील मनसेच्या चार प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सोमवारी ठाकरे गटामध्ये प्रवेश केला. उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत त्यांनी शिवबंधन बांधले. यावेळी माध्यमांशी बोलताना उद्धव ठाकरेंनी नरेंद्र मोदी, अमित शाह, जेपी नड्डा यांच्यासह भाजपच्या नेत्यांवर टीकास्त्र सोडलं.

## शिक्षणाधिकाऱ्यांच्या निर्णयाकडे लक्ष

कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. शाळा बंद होणार असल्याची वार्ता वाऱ्यासारखी पसरताच पालकवर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. ही शाळा सुरु ठेवण्याबाबत पालकांची मागणी जोर धरू लागली. वेगवेगळ्या बैठकीच्या माध्यमातून शाळेचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तरीदेखील यश आले नाही. अखेर हा प्रश्न जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे गेला.

शाळेच्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी यासाठी गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी शाळेच्या वर्गात सुनावणी घेण्यात आली. या बैठकीला आरसीएफ कंपनीचे अधिकारी, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे संचालक, पालक, विद्यार्थी, शिक्षकांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी केंद्रप्रमुख सुबोध पाटील, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका संविधा जाधव, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका प्राची बांदिवडेकर, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. मात्र, कंपनीसह एज्युकेशन सोसायटीचे कोणीही या बैठकीला हजर झाले नाही.

यावेळी गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांनी विद्यार्थ्यांसह पालकांचे मत ऐकून घेतले. त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात देण्याचे आवाहन केले. त्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. शाळा सुरु राहण्याबाबत पालकांचे, विद्यार्थ्यांचे सकारात्मक मत घेऊन त्याचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी यांना पाठविला जाणार असल्याचे पिंगळा यांनी सांगितले. त्यामुळे आरसीएफ शाळेचा प्रश्न सुटण्याची शक्यता वर्तविली जात आहे. शिक्षणाधिकारी काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

**पहिलीपासून या शाळेमध्ये मी शिक्षण घेत आहे. सध्या इयत्ता बारावीच्या वर्गात आहे. या शाळेत चांगले शिक्षण मिळत आहे. मुलांच्या बौद्धिक व शारीरिक क्षमतावाढीसाठी शाळेमध्ये वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. ही शाळा सुरुच राहिली पाहिजे.**

**- सर्वेश कानप, विद्यार्थी**

## गीतेसाहेबांची ढाल म्हणून उभा आहे : आ. जाधव

उभे केले, तरीही या निवडणुकीत काहीही परिणाम होणार नाही.

देशामध्ये मोदी सरकारविरोधात प्रचंड चीड निर्माण झाली आहे. भारत देश अबाधित राहिला पाहिजे म्हणून नरेंद्र मोदी सरकार हटाव आणि भारत देश बचाव या भूमिकेतून हे सरकार हटविण्यासाठी या देशातील मतदार सज्ज झाला आहे. त्याचा इंडिया आघाडीला चांगला फायदा होईल. कोकण विशेष करून रायगड हा औद्योगिक जिल्हा म्हणून जाहीर झाला आहे. जिल्ह्यात अधिक औद्योगिकीकरण वाढविणे, राज्याबाहेर जाणारे प्रकल्प रोखण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करणे, तरुणांच्या हाताला काम मिळणे, आंबा बागायतदार, मच्छिमारांची आर्थिक उन्नती झाली पाहिजे, शैक्षणिक, पर्यटन अशा स्थानिक प्रश्नांना प्राधान्य दिले जाणार आहे, असेही जाधव म्हणाले.

नरेंद्र मोदी किंवा महाराष्ट्र सरकाच्या जाहिराती जनतेच्या पैशातूनच केल्या जात आहेत. याचा विचार जनतेने करणे आवश्यक आहे. मागच्या अधिवेशनात महाराष्ट्र सरकारने जे बजेट सादर केले, त्यामध्ये एक हजार कोटी रुपये जाहिरातींवर खर्च केले आहेत. सर्वसामान्य जनतेच्या खिशातील पैशातून आपल्या व पक्षाच्या जाहिराती करायचे, हे सर्वसामान्य जनतेच्या लक्षात आले आहे. त्यामुळे या निवडणुकीत त्यांना त्यांची जागा जनताच दाखविणार आहे, असे भास्कर जाधव म्हणाले.

पुढे ते राज ठाकरे यांच्याबद्दल म्हणाले, राज ठाकरेंबद्दल खूप वाईट वाटत आहे. त्यांच्या राजकीय कारकीर्दीबद्दल शोकांतिका सुरु आहे. त्याबद्दल अत्यंत्य वेदना होत आहेत. त्यांच्यासारखा चांगला नेता या महाराष्ट्रातून बाद होणे हे अत्यंत वाईट आहे. लहान-मोठे पक्ष या देशात ठेवायचे नाहीत ही भूमिका भाजपसह अमित शहा यांनी घेतली आहे, त्याची सुरुवात राज ठाकरे, एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यापासून झाली आहे. तो प्रयत्न उद्धव ठाकरे यांच्याबाबतही करण्याचा प्रयत्न केला. मात्र, ते खंबीर उभे राहिल्याने भाजपला ते शक्य झाले नाही, असेही जाधव यांनी सांगितले.

## पाच उमेदवारी अर्ज दाखल

अनंत गंगाराम गीते आणि महायुतीचे राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) सुनील तटकरे यांच्यामध्येच खरी लढत होणार आहे. दोन्ही प्रतिस्पर्धी तिसऱ्यांदा आमनेसामने येत आहेत. २०१४ साली अनंत गीते, तर २०१९ साली तटकरे विजयी झाले होते. आता २०१४ ची पुनरावृत्ती करण्यासाठी गीते सरसावले आहेत. त्यांना शेकापने पाठिंबा दिला आहे. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित असल्याचे मानला जात आहे.

गीते यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. गीतेंच्या डोक्यावर शेकापने हात ठेवला आहे. त्यामुळे विरोधकांच्या तंबूत घबराट पसरली आहे. अनंत गीते यांच्या नावाचा फायदा घेण्यासाठी दोन अपक्ष अनंत गीते नावाच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र, ओरीजनल गीते यांची निशाणी मशाल आहे. मशाल ही रायगड लोकसभा मतदारसंघातील मतदारांमध्ये पोहोचली आहे. त्यामुळे नाम साधर्म्याचा फायदा कोणत्याही उमेदवाराला मिळणार नसल्याचे बोलले जाते.

## ‘मोदी’ करणार सुनील तटकरेंचा पराभव

तर २०१९ च्या निवडणुकीत शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी हाच मोदी फॅक्टर तटकरेंच्या बाजूने उतरवल्याने तटकरे निवडून आले होते. मात्र, तटकरेंनी खासदार होऊन काय केले, असा सवाल मोदी फॅक्टरला पडला आहे. या समाजाला न्याय देण्यात तटकरेंना यश आलेले नाही. मराठा आरक्षणावरुन राज्यातील सरकारने योग्य तो निर्णय घेतला नाही. त्यामुळे मराठा, ओबीस समाज नाराज आहे. दलितांच्या प्रश्नांकडेदेखील तटकरेंनी म्हणावे तसे लक्ष दिले नाही. भाजपाचे कर्नाटकातील खासदार अनंत हेगडे, राजस्थान-नागोर लाकेसभा उमेदवार ज्योती मिर्धा, उत्तर प्रदेशमधील खासदार लल्लू सिंह असे नेते खुलेआमपणे देशाचे संविधान बदलण्याची भाषा करत आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये असंतोष खदखदत आहे. एनआरसी, सीएए अशा विविध कायद्यांमुळे मुस्लिम समाजामध्ये दहशत आहे. या समाजाच्या दफनभूमीचे प्रश्न सोडवण्यात तटकरे कमी पडल्याचा आरोप अलीकडेच करण्यात येत आहे. सध्या तटकरे हे धर्मांध पक्षासोबतच्या महायुतीत, म्हणजेच भाजपासोबत गेल्याने ही दहशत अजून वाढली आहे.

मोदी फॅक्टरमधील सर्व समाजात बेरोजगारीचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. जिल्ह्यातील विविध प्रकल्प प्रलंबित आहेत. विविध प्रस्तावित धरणे प्रलंबित आहेत. अलिबागच्या रेल्वेचा प्रश्न, मुंबई-गोवा महामार्गाची रखडपट्टी, पाणीटंचाई असे विविध प्रश्न आ वासून उभे आहेत. त्यामुळे मोदी फॅक्टरमध्ये प्रचंड नाराजीचा सूर आहे.

७ मे रोजी होणाऱ्या निवडणुकीत तटकरेंना अस्मान दाखवण्याचा निर्धार मोदी फॅक्टरने केला आहे. त्यामुळे महायुतीला आतापासूनच हादरे बसू लागले आहेत, तर तटकरेंची डोकेदुखी वाढली आहे.

## एसटी कर्मचाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

आगारातील कर्मचारी विश्रामगृहाजवळ बसला होता. त्याने तेथील एका झाडाला अडकून गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब तेथील कर्मचाऱ्यांच्या लक्षात आल्यावर त्याला वाचविले. त्यामुळे सुदैवाने त्याचा जीव वाचला. या घटनेची माहिती अलिबाग पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करून पंचनामा तयार केला. ड्युटी लावणारे अधिकारी चांगली वागणूक देत नाही, या कारणावरून त्याने आपले जीवन संपविण्याचा प्रयत्न केला असल्याची चर्चा जोरात सुरु आहे. याबाबत आगार व्यवस्थापक अजय वनारसे यांना विचारणा केली असता, कर्मचारी दारु पिऊन होता. त्याला डबल ड्युटीवर जायचे होते. मात्र, प्रवासी नसल्याने ती ड्युटी रद्द केली. त्यावरून त्याने वाद घातला होता. या कर्मचाऱ्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला होता. पोलिसांना बोलावून तात्काळ कारवाई केली, असे त्यांनी सांगितले.

## राष्ट्रवादीच्या सरचिटणीसांना सहा महिन्यांची सजा

हजार रुपये एवढा दंड म्हणून भरण्याची व सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. आरोपीने दंडाची रक्कम भरण्यास कसूर केल्यास तीन महिने साध्या कारावासाची शिक्षादेखील सुनावण्यात आली आहे. आरोपीने भरलेल्या दंडाच्या रकमेपैकी रक्कम रुपये ४ लाख २० हजार फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून अपिलीय कालावधीनंतर देण्यात यावे. उर्वरित रक्कम सरकारजमा करण्यात यावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. आरोपीने दंडाची रक्कम न भरल्याबाबतची तसेच इतर कोणत्याही गुन्ह्यामध्ये आरोपीस शिक्षा झाल्यास या गुन्ह्यातील शिक्षा मूळ शिक्षेच्या क्रमवर्ती पद्धतीने भोगावयाची आहे. तसेच आरोपीच्या वैयक्तिक जामीनकदबे व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत, असा निकाल न्या. प्रितेश देशपांडे यांनी १२ मार्च रोजी आरोपी गंगाधर पाटील यांच्याविरुद्ध दिला आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, गंगाधर पाटील हे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ‘अजित पवार गट’ जिल्हा सरचिटणीस असून, खासदार सुनील तटकरे यांचे खंदेसमर्थक आहेत. त्यामुळे धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणात दोषी ठरवून शिक्षेस पात्र झाल्याने ऐन लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळेस पेणसह रायगडमध्ये चर्चेला उधाण आले आहे.





# घोषणाबाजी अन् जल्लोष

## अनंत गीते यांना पाठिंबा देण्यासाठी कार्यकर्त्यांनी केली गर्दी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघातील इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांचा अर्ज सोमवारी (दि.१५) भरण्यात आला. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांच्याकडे हा अर्ज दुपारी दाखल करण्यात आला. यावेळी एक वेगळा उत्साह कार्यकर्त्यांमध्ये दिसून आला.

इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते उमेदवारी अर्ज भरणार असल्याने त्यांना पाठींबा देण्यासाठी शेतकरी भवन ते शिवसेना भवन परिसरात सोमवारी सकाळी नऊ वाजल्यापासून कार्यकर्त्यांनी गर्दी करण्यास सुरुवात केली होती. सकाळी अकरा वाजल्यापासून हा परिसर कार्यकर्त्यांनी बहरून गेला. शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, उमेदवार अनंत गीते, आ.भास्कर जाधव आदी इंडिया आघाडीच्या नेत्यांचे शेतकरी भवनजवळ आगमन होताच, गीते साहेबांचा विजय असो, इंडिया आघाडीचा विजय असो, अशा घोषणा कार्यकर्ते देत होते.

शेतकरी भवन येथून रॅलीला सुरुवात झाली. ही रॅली जोगळेकर नाका, छत्रपती शिवाजी चौक, बालाजी नाका, मारुती नाका, कर्वे रोड ते जिल्हाधिकारी अशी काढण्यात आली. यावेळी माजी आ. पंडित पाटील, माजी आ. अनिल तटकरे, माजी आ. संजय कदम, काँग्रेसचे नेते ॲड. प्रवीण ठाकूर, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, अलिबाग नगरपरिषदेचे माजी अध्यक्ष प्रशांत नाईक, माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, काँग्रेसच्या जिल्हा महिला अध्यक्षा ॲड. श्रध्दा ठाकूर, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, युवा नेते सवाई पाटील, विष्णू पाटील, संदिप घरत, शिवसेना तालुका प्रमुख शंकर गुरव, संदीप पालकर, रवि ठाकूर, शिवसेनेचे पिंट्या ठाकूर, सुनील थळे यांच्यासह शेकाप व इंडिया आघाडीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वेगवेगळ्या संस्था, संघटनांनी अनंत गीते यांचे जल्लोषात स्वागत केले. अलिबागमधील मुस्लिम समाजाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. त्यानंतर ही रॅली शिवसेना भवनजवळ थांबली. कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून गीतेंनी अभिवादन केले. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना भेटून त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर रॅली जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वळली.

एक वेगळा उत्साह या रॅलीमध्ये कार्यकर्त्यांमध्ये दिसून आला. ज्येष्ठ कार्यकर्त्यांसह, तरुण कार्यकर्त्यांनी रॅलीत सहभाग घेऊन गीते यांच्या उमेदवारीबाबत आनंद व्यक्त केला. शेकाप नेते आ. जयंत पाटील यांच्या उपस्थितीत सोमवारी दुपारी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे अनंत गीते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.













## वेधक

### निरीक्षकपदी गायकवाड

**रसायनी :** अखिल भारतीय युवक काँग्रेसच्या वतीने प्रदेश सचिव रसायनी रिस येथील प्रशांत गायकवाड यांची कर्नाटक राज्याच्या चिकोडी लोकसभा मतदारसंघाच्या निरीक्षकपदी निवड करण्यात आली आहे. युवक काँग्रेसचे प्रशांत गायकवाड यांनी राजीव सातव यांच्यासोबत गुजरात राज्यांमध्ये निवडणुकांमध्ये मोलाची कामगिरी बजावली होती. त्यामुळे त्यांना निवडणुकीचा दांडगा अनुभव व पक्षासाठी दिवस-रात्र झोकून काम करण्याची इच्छा यामुळे पक्षश्रेष्ठींनी त्यांना कर्नाटक राज्यामध्ये निरीक्षक म्हणून निवड केली आहे.

### रोकड लांबविली

**माणगाव:** घरातील कपाटातून ८० हजार रुपयांची रोख रक्कम घेऊन अज्ञात चोरटा फरार झाला आहे. सदरची घटना माणगाव तालुक्यातील नाणोरे येथे घडली. या घटनेची फिर्याद महेंद्र तुकाराम पाटोळे यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. सदर घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील अज्ञात चोरट्याने नाणोरे येथे फिर्यादी महेंद्र तुकाराम पाटोळे यांच्या घराच्या कपाटातील रोख रक्कम ८० हजार रुपये चोरून नेले.

### निबंध स्पर्धा संपन्न

**अलिबाग :** जेएसएम महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताह पार पडला. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष गौतम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व कर्तृत्वावर आधारित निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत २४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ११ ते १३ एप्रिलदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त सलग १२ तास वाचन उपक्रम अभ्यासपर्व आयोजित करण्यात आला होता. यात ५६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, ग्रंथपाल प्रा. सुबोध डहाके, ग्रंथालय समिती प्रमुख प्रा. जयेश म्हात्रे आदी उपस्थित होते.


## रायगडात आढळले २६५ अशुद्ध पाणी नमुने

# जिल्हा प्रशासनाने केले शुद्ध

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील पंधरा तालुक्यातून पाणी व स्वच्छता मिशन कक्षाकडून तपासण्यात आलेल्या १९१४६ पाणी नमुन्यांपैकी २६५ नमुने प्रयोगशाळेत दूषित आढळले. त्यामुळे जिल्ह्यातील जवळपास दीड टक्के पाणी दूषित असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामध्ये म्हसळा,मुरुड, श्रीवर्धन, सुधागड आणि तळा या पाच तालुक्यांतील पाण्याचा एकही नमुना दूषित नसल्याचे आढळून आले. दूषित आढळलेले पाणी नमुने प्रशासनाने शुद्ध केले आहेत.

दूषित पाण्यामुळे कावीळ, अतिसार, गॅस्ट्रो आदी साथीचे आजार कुठेही पसरलेले नाही. कारण जिल्ह्यात ग्रामपंचायतींकडून टी.सी.एल.पावडर देण्यात येते. प्रत्येक महिन्याला जिल्ह्यातील वेगवेगळ्या पाणी स्रोतांचे नमुने



जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील एकूण ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून जलस्रोतांचे नमुने संकलित करण्यात येतात. हे पाण्याचे नमुने अलिबाग येथील जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा आणि कर्जत, पेण, रोहा, माणगाव आणि महाड या उप विभागीय आरोग्य प्रयोगशाळेत अणुजीव तपासणीकरिता पाठविण्यात येतात.

घेतले जातात. त्या नमुन्यांची जैविक व रासायनिक तपासणी करण्यात येते. नमुना दूषित आल्यास त्यावर तत्काळ उपाययोजना करतात.

पाण्याची दोन प्रकारे तपासणी करण्यात येते, त्यामध्ये जैविक, रासायनिक तपासणी केली जाते. पाण्यामुळे होणारे आजार टाळण्यासाठी शुद्ध पाणी प्यावे, पाणी उकळून प्यावे, मेडिक्लोअरचा वापर करावा, पाणी फिल्टर करून पिणे गरजेचे आहे.

जिल्हा परिषद आरोग्य विभाग आणि ग्रामपंचायत यांच्या मदतीने पाणी नमुने तपासण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येते. ग्रामपंचायत आणि आरोग्य विभाग यांच्या जलदुतांमार्फत दर महिन्याला काही ठराविक भागातील पाणी नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येतात. त्यानंतर प्रयोगशाळेत या पाणी नामुन्यांची तपासणी करून हे पाण्याचे स्रोत पिण्यायोग्य आहेत की अयोग्य, याबाबतचा अहवाल प्रयोगशाळेमार्फत देण्यात येतो. पाणी नमुने दूषित आढळून आल्यास ते जलस्रोत शुद्ध करण्यासाठी ग्रामपंचायत व आरोग्य विभागामार्फत उपाययोजना करण्यात येतात. दूषित पाण्यावर शुद्धीकरण प्रक्रिया केल्यानंतर पाणी पिण्यायोग्य आहे की नाही, हे बघण्यासाठी पुन्हा नमुने तपासण्यात येतात. त्यानंतरच पिण्यासाठी पाणी वापरले जाते; मात्र जिल्ह्यातील दूषित पाण्याचे संकट कायम आहे. हे प्रमाण पाहता वेळीच खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे, अन्यथा हे दूषित पाणी जलजन्य आजारांचे कारण ठरू शकते.

शासनाच्या निर्णयानुसार, आता जिल्ह्यातील सर्व ८११ ग्रामपंचायतींमध्ये पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांची जलसुरक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले आहे. पाणी नमुने घेवून ते प्रयोगशाळेत पाठविणे, चाचणीचे अहवाल आल्यावर पाणी शुद्धीकरण करणे गरजेचे असल्यास त्यासाठीची प्रक्रिया ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पूर्ण करुन जलस्रोत शुद्ध करणे, पाण्याची गुणवत्ता राखणे ही कामे ङ्गजलसुरक्षकफ यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.या कामाचा मोबदला म्हणून जलसूरक्षक यांना जैविक पाणी नमुण्यासाठी चाळीस रुपये आणि रासायनिक पाणी नमुन्यासाठी वीस रुपये असा मोबदला दिला जात असून मासिक प्रोत्साहन भत्ता हा शंभर रुपये दिला जातो. तसेच वर्षातून दोन दिवस प्रत्येक पंचायत समिती स्तरावर प्रशिक्षणसुद्धा दिले जाते. याचा प्रत्येक दिवशीचा भत्ता हा शंभर रुपये दिला जातो.

## ‘आयुष्यमान’चा लाभ १२४ जणांना

**। उरण । वार्ताहर ।**

जायंट्स ग्रुप ऑफ उरण, श्री समर्थकृपा स्वयंसहायता संस्था आणि गोपाळकृष्ण वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकीम्हणूनशासकीयसहकार्य योजनेतुन आभा कार्ड,आयुष्यमान भारत कार्ड योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना शिबीर घेण्यात आले. यावेळी संगिता सचिन ढेरे, ॲड. पराग म्हात्रे, मंजुकुमार, प्रियंवदा तांबोटकर, विनायक पै, ॲड. प्रतिभा भालेराव, ॲड. वर्षा पाठारे, देवेंद्र पिंपळे, योगेश म्हात्रे, आनंद ठक्कर, तृप्ती भोईर, कविता म्हात्रे, राजेश शहा, जिजा घरत, अवनी चोरगे उपस्थित होते. अर्चना चोरगे, मनाली कांबळे, वृषाली पवार आदी सदस्यांनी नागरिकांना आभा कार्ड व आयुष्यमान भारत कार्ड काढून दिले. यावेळी १२४ लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. हा समाजोपयोगी उपक्रम मोठ्या उत्साहात उत्तम प्रतिसादात यशस्वीरित्या पार पडला. सर्वांचे मोगऱ्याची रोपे व तुळशीची रोपे देऊन सत्कार आणि स्वागत करण्यात आले.

## अलिबाग येथे वॉक फॉर वोट रॅली



**। अलिबाग । वार्ताहर ।**

शहरात वॉक फॉर वोट रॅलीचा शुभारंभ जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. वॉक फॉर वोट रॅलीसाठी जिल्हाधिकारी जावळे यांच्यासह उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी निर्मला कुचिक, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे, अलिबाग तहसीलदार विक्रम पाटील, अलिबाग नगर परिषद मुख्याधिकारी अंगाई साळुंखे आदी उपस्थित होते. यावेळी अंगणवाडी सेविका वैशाली पाटील यांनी लोकशाहीचा उत्सव पोवाडा सादर केला.

लोकसभा निवडणुकीसाठी जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी जनजागृती केली जात आहे. याकरिता विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत.

## विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू

**। नवी मुंबई । वार्ताहर ।**

वाशी तरण तलावात अग्रेल शाळेत शिकणाऱ्या एका १७ वर्षीय विद्यार्थ्याचा स्विमिंग पुलात बुडून मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद केला आहे. मयूर ढमाले असे मयत विद्यार्थ्याचे नाव आहे. तो नेरुळ येथे राहत असून फादर अग्रेल शाळेत अकरावीत शिकत होता. आज एक ते दीडच्या सुमारास क्रीडा तासिकेत पोहण्यासाठी असलेल्या समूहास पोहण्याचे धडे दिले जाणार होते. त्यासाठी विद्यर्थ्यांना स्विमिंग पुलात उतरविण्यात आले. यात अनेकांना पोहता येत होते, मात्र पोहण्याच्या विविध स्पर्धेसाठी पोहण्याचे प्रशिक्षण दिले जात होते. पाण्यात उतरलेला मयूर हा खोल पाणी क्षेत्रात गेला व तेथेच बुडाला.

## उरण-पनवेल मार्गाच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव

### नवघर फाटा ते बोकडविरा पोलीस चौकीपर्यंत चौपदरी मार्ग



**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील प्रमुख मार्ग असलेल्या उरण-पनवेल या राज्य महामार्गाचे सिडकोच्या माध्यमातून रुंदीकरण करण्यात येणार आहे. त्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असल्याची माहिती सिडकोकडून देण्यात आली आहे.

उरणमधील वाढत्या नागरी व औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्या आणि वाहनांतही अनेक पटीने वाढ झाली आहे. त्यामुळे या मार्गावरील अपघातातही वाढ झाली आहे. त्यामुळे जुना नवघर फाटा ते उरणच्या कोटनाका दरम्यानच्या रस्त्याच्या रुंदीकरणाची मागणी करण्यात आली होती. यातील सार्वजनिक बांधकाम विभागाने काही महिन्यांपूर्वीच नवघर फाटा ते बोकडवीरा पोलीस चौकी असा चार ते साडेचार किलोमीटर लांबीचा मार्ग सिडकोच्या ताब्यात दिला आहे. त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे.

### कांदळवनांचा अडथळा येणार

**उरण-पनवेल मार्गावर बोकडवीरा येथील वायू विद्युत केंद्र कामगार वसाहत ते फुंडे महाविद्यालयापर्यंतच्या मार्गाच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात कांदळवनांचे वृक्ष आहेत. त्यामुळे रस्ता रुंदीकरणात अडथळा निर्माण होण्याची शंका व्यक्त केली जात आहे.**

बोकडवीरा पोलीस चौकी ते उरण शहरातील कोटनाकापर्यंतच्या एक ते दीड किलोमीटरच्या मार्गाचे काय होणार, या मार्गाचेही रुंदीकरण होणार का, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. काही दिवसांपूर्वी बोकडवीरा पोलीस चौकी ते कोटनाका दरम्यानच्या रस्त्यालगतची अनधिकृत दुकाने, व्यवसाय यांच्यावर सिडकोच्या अनधिकृत बांधकामविरोधी पथकाने कारवाई केली होती. त्यामुळे संपूर्ण मार्गाचे रुंदीकरण करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

# असली आणि नकली

नरेंद्र मोदी आणि अमित शाह महाराष्ट्रात येऊन नवनवीन वाद निर्माण करीत असतात. विक्रमी फोडाफोडी, इडीचा वापर इत्यादी करूनही राज्यात विरोधक शिल्लक आहेत हे पाहून त्यांचा सतत जळफळाट चालू असतो. तो मग अशा वक्तव्यांमधून बाहेर पडतो. मध्यंतरी शरद पवारांनी महाराष्ट्रासाठी काय केले असा सवाल जळगावमध्ये शाह यांनी केला होता. नंतर महाराष्ट्राचा खरा विकास नरेंद्र मोदींच्या काळातच झाला असा षटकार त्यांनी लगावला. महाराष्ट्र हा १९६० च नव्हे तर त्याहीपूर्वीपासून एक प्रगत राज्य म्हणून ओळखला जातो. इथे मुंबई असल्याचा फायदा राज्याला जरुर झाला. पण राज्यात इतरत्रही आपल्या युक्ती व शक्तीच्या बळावर लोकांनी अनेक उद्योग उभारले. शेतीत नवनवे प्रयोग केले. शिक्षणाच्या बाबतीतही महाराष्ट्र अग्रेसर आहे. हे सर्व मोदी येण्याआधीपासून चालू आहे हे शाह यांना देवेंद्र फडणवीसांनी सांगायला हवे. आता शाह यांनी असली आणि नकलीचा वाद काढला आहे. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांचे पक्ष नकली आहेत अशी टीका त्यांनी प्रचारसभेत केली आहे. हे दोन्ही पक्ष फोडले भाजपने. त्याबाबत फडणवीस शेखी मिरवत असतात. हुडी घालून एकनाथ शिंदे यांच्यासोबत रात्रीच्या गुप्त बैठका कशा केल्या याची वर्णने ते करीत असतात. शिंदे आणि मंडळींची सुरत आणि गुवाहाटीमधील व्यवस्थाही भाजपवाल्यांनीच केली होती. आपल्या मागे दिल्लीची महाशक्ती आहे असे शिंदे यांनी तेव्हा म्हटले होते. नंतरही शिंदे येता-जाता मोदींचे नाव घेत असतात. मध्यंतरी कोल्हापुरातील शिवसेनेच्या अधिवेशनात पहिला ठराव हा मोदींच्या अभिनंदनाचा होता. जुन्या काळातील शिवसेना महाराष्ट्र व मराठीचा स्वाभिमान बाळगणारी होती. महाराष्ट्राचा अप्रत्यक्ष दुस्वास करणाऱ्या गुजराती दिल्लीश्वरांच्या पायी लोटांगण घालणारी नव्हती. निवडणूक आयोग आणि आपल्याच विधानसभा अध्यक्षांकरवी मान्यता मिळवून दिली म्हणून वास्तव बदलत नाही.

### फोटो हवा, पण...

ठाकरे किंवा पवार यांचे बहुसंख्य आमदार त्यांना सोडून गेले हे खरे आहे. पण इडीची भीती, सत्तेचा दबाव व इतर अनेक कारणांनी हे घडले. यामुळे ठाकरे किंवा पवार यांचे पक्ष हे बेदखल वा नकली ठरू शकत नाहीत. गंमत अशी आहे की, बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची सूत्रे स्वतःच्या हयातीत उद्धव यांच्याकडे सोपवली. शिंदे यांनी त्यांच्यासोबत राहून सत्ता उपभोगली. इतरांना डावलून मिळालेली पदे घेतली. उद्धव यांनी काँग्रेससोबत जाण्याचा निर्णय घेतल्यावरही ते सत्तेत कायम राहिले. महत्वाची खाती त्यांना मिळाली. नंतर एक दिवस अचानक त्यांना बाळासाहेबांच्या तत्वांची आठवण झाली. अजितदादांनी तर याहूनही अधिक उलटसुलट गोष्टी केल्या. बाळासाहेब पडद्याआड गेले. पण राष्ट्रवादीची स्थापनाच ज्यांनी केली त्यांनाच त्यांनी बेकायदेशीर आणि नकली ठरवण्याचा प्रयत्न केला. शिंदे किंवा अजित पवार या दोघांनाही बाळासाहेब ठाकरे व शरद पवार यांचे फोटो वापरायचे आहेत, त्यांच्या नावाचा जमेल तितका फायदा उकळायचा आहे आणि वर पुन्हा स्वतःचे गट हेच खरे असेही म्हणायचे आहे. राज्यातील जनतेमध्ये यावरून असंतोष आहे. इथे भाजपविरोधी वातावरण होण्यामध्ये या असंतोषाचा मोठा वाटा आहे. पण भाजप नेते त्याला एकतर कमी लेखत आहेत किंवा आंधळे झाले आहेत. त्यामुळेच शाह येथे येऊन लोकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा उद्दामपणा करू शकतात. अर्थात शाह यांच्या शब्दांना मुळात काही किंमत आहे असे समजण्याचे कारण नाही. नीतीशकुमार यांच्यासाठी भाजपचे दरवाजे कायमचे बंद झाले आहेत असे याच शाह यांनी दोन वर्षांपूर्वी जाहीरपणे बजावले होते. आता तेच नीतीश पुन्हा भाजप आघाडीत आले आहेत. इतकेच नाही तर सर्वात कमी जागा असूनही मुख्यमंत्रीपदही त्यांनी राखले आहे. सर्वशक्तिमान मोदी व शाह हे तेथे काहीही करू शकलेले नाहीत.

### जुमलेबाज

२०१४ च्या निवडणुकीपूर्वी, बाहेरचा काळा पैसा देशात आणून प्रत्येकाच्या खात्यात पंधरा लाख रुपये देण्याचे आश्वासन नरेंद्र मोदी यांनी दिले होते. पण याच अमित शाह यांनी निवडणुकीनंतर हे आश्वासन म्हणजे एक चुनावी जुमला होता असे जाहीर करून टाकले होते. लोकांना फसवण्यासाठी आपण काहीही बोलू शकतो याची ती स्पष्ट कबुली होती. त्यामुळे या शाहसाहेबांचेच बोलणे नकली असते असे म्हणायला हवे. येत्या निवडणुकीत सेना व राष्ट्रवादीतील फुटीबाबत मतदारांना काय वाटते ते दिसेलच. ठाकरे व पवार भाजपविरोधी भूमिका घेऊन ज्या ठामपणे उभे आहेत त्यावरचा तो कौल असेल व तो त्यांच्या बाजूनेच असेल यात शंका नाही. पण समजा तो काहीही असला तरी त्यामुळे त्यांचे पक्ष नकली ठरू शकत नाहीत. कारण, शाह व मोदींच्या पाशवी शक्तीपुढे उभे राहण्याची हिंमत या दोघांनी व त्यांच्या पक्षांनी दाखवलेली आहे ही वस्तुस्थिती पुसून टाकता येणारी नाही. शाह यांचेच भाईबंद असलेले राज ठाकरे यांनी परवा उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. उद्धव यांची सत्ता गेली व आमदार फुटले म्हणून ते मोदींवर टीका करीत आहेत असा दावा त्यांनी केला. २०१९ ला आपण लाव रे तो व्हिडियो असे म्हणून जी टीका करीत होतो ती तत्वासाठी होती असा त्यांचा दावा आहे. यात गंमत अशी आहे की, उद्धव यांनी मोदींशी जुळते घेतले असते तर त्यांचा पक्ष आज सत्तेत असता. तसा प्रस्ताव भाजपने अनेकवार उद्धव यांना दिला आहे. पण तो मान्य न करून प्रवाहाच्या विरोधात पोहण्याचे धाडस ते दाखवत आहेत. याउलट राज हे मात्र इडीची एक नोटीस आल्याबरोबर मोदींबाबतची भूमिका बदलून आता त्यांची स्तुती करीत आहेत. भाजप आणि त्याचे मित्र हे अट्टल जुमलेबाज आहेत. आज त्यांच्याकडे सांगण्यासारखे ठोस काहीही नाही. त्यामुळे कधी काँग्रेसला मुस्लिम लीग म्हण तर कधी शिवसेनेला नकली असले उपद्व्याप चालू आहेत.

विचार

# वाचाळणे ते व्यर्थ

**राजस्थान आणि पश्चिम बंगाल वेगवेगळ्या टोकांवर आहेत; परंतु दोन भिन्न राजकीय रेषा असणाऱ्या नेत्यांच्या भाषणातील समान धागा राममंदिराच्या मुद्याच्या अखंड भारत विस्ताराकडे निर्देश करतो. भाजपने पुन्हा एकदा संपूर्ण देशाला राममय करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. राम मंदिराच्या निमित्ताने भाजपला हवे तसे वातावरण तयार केले होतेच. आता अन्य पक्षही प्रचारात रामाचा मुद्दा वेगळ्या अर्थाने वापरताना दिसत आहेत.**



**प्रा. अशोक ढगे**

भारतीय जनता पक्ष वर्षानुवर्षे लोकसभेच्या तसेच अन्य निवडणुकांमध्ये राम मंदिराच्या मुद्याचे भांडवल करत होता. आता राम मंदिर पूर्ण झाले आहे. राम मंदिरानंतर काशी, मथुरेसह अन्य मुद्दे हातात घेण्याचे जाहीर करत असताना राम मंदिराच्या मुद्याचे पूरेपुर श्रेयही भाजप घेणार यात कोणतीही शंका नव्हती. राम मंदिर पूर्ण झाल्याचा इव्हेंट देशभर मोठ्या धुमधडाक्यात संपन्न झाला. खरे तर राम मंदिर पूर्ण झाल्यानंतर रामराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी काम करणे अपेक्षित होते; परंतु तसे झाले नाही. प्रभू श्रीराम व्यक्तीद्वेषी नव्हते. त्यांचा अपप्रवृतीला विरोध होता. एकवचनी, एकपत्नी अशा रामाचा आदर्श घेऊन वाटचाल करणे सोपे नाही. त्यातच आता जिंकण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याचा काळ आहे. पराकोटीचा व्यक्तिद्वेष, हिंसा, भावना भडकावण्यास प्राधान्य या सगळ्या कुप्रवृत्ती राजकारणाचा भाग झाल्या आहेत. यापूर्वीही रामाच्या नावाखाली दंगे भडकावण्याचे राजकारण आपण पाहिले आहे. अजूनही ते सुरूच आहे.

विरोधक राम मंदिराच्या उद्घाटनाला न आल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजकारण सुरू केले. खरे तर राम हृदयात असावा लागतो, तो अयोध्येत गेल्यानंतरच भेटतो असे नव्हे. हनुमानाने नाही का राम हृदयात असल्याचे दाखवून दिले होते? रामभक्त आहे की नाही, हे 'जय श्रीराम'च्या घोषणा दिल्यावरून सिद्ध होत नसते. राम आचरणात आणावा लागतो. मुलाचे नाव राम ठेवले आणि तो गुन्हेगारीकडे वळला तर तो रामाचा दोष नसतो. 'नाव सोनुबाई आणि हाती कथलाचा वाळा' असे अनेकजणांबाबत होते. शिवाय देवाचे अवडंबर माजवण्यापेक्षा त्याच्या आदर्शाचे आचरण करणे केव्हाही चांगले असते. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यात रामावरून सुरू झालेल्या कलगीतुऱ्याकडे पहावे लागेल. ममतादीदी राजकीय हितसंबंध लक्षात घेऊन रामाचे नाव घेत आहेत हे नक्की; पण निदान त्या हा मुद्दा चर्चेत तरी आणत आहेत. राम मंदिराच्या उभारणीचा उत्तर प्रदेशात सर्वाधिक राजकीय परिणाम होईल, असे आधीच मानले जात असून भाजपचे स्टार प्रचारक म्हणून योगी आदित्यनाथ यांनी देशभर जनजागृती सुरू केली आहे. आदित्यनाथ यांची राजस्थानमधील निवडणूक रॅली हे त्याचे ताजे उदाहरण म्हणावे लागेल. राम मंदिराच्या निमित्ताने आदित्यनाथ यांनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे तर पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी भाजपवर रामाच्या नावाने दंगली भडकवल्याचा आरोप करत आहेत.

राजस्थान आणि पश्चिम बंगाल वेगवेगळ्या टोकांवर आहेत; परंतु दोन भिन्न राजकीय रेषा असणाऱ्या नेत्यांच्या भाषणातील समान दुवे राममंदिराच्या मुद्याच्या अखंड भारत विस्ताराकडे निर्देश करतात. भाजपने पुन्हा एकदा संपूर्ण देश राममय करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. या वर्षी २२ जानेवारीला अयोध्येत राम मंदिराच्या उद्घाटनाच्या निमित्ताने भाजपला हवे तसे वातावरण आधीच तयार झाले होते आणि जवळपास तशीच तयारी आता १७ एप्रिलच्या निमित्ताने केली जात आहे. राम मंदिर उभे राहिल्यानंतरची ही पहिली रामनवमी आहे. या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी अयोध्येला जाऊ शकतात. विशेष म्हणजे रामनवमीच्या दोन दिवसांनंतर म्हणजेच १९ एप्रिलला देशात लोकसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याचे मतदान होणार आहे. थोडक्यात, रामनवमी हा पहिल्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस असेल. असा योगायोग वारंवार येत नाही. योगायोग निर्माण झाला की प्रयोग करण्यात कुणी मागे का रहावे? आदित्यनाथ आणि ममता यांच्या प्रचारातील संदर्भ वेगळे आहेत पण मुद्दा एकच आहे... तो म्हणजे 'राम नाम' आणि दंगल...!

आदित्यनाथ यांनी राजस्थानमध्ये काँग्रेसवर निशाणा साधला आहे. तिथे भाजप आणि काँग्रेसमध्ये सरळ लढती आहेत. तशीच लढत पश्चिम बंगालमध्ये भाजप आणि तृणमूल काँग्रेसमध्ये आहे. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेससाठी भाजप हे सर्वात मोठे आव्हान आहे. ममता बॅनर्जी यांना काँग्रेसची पर्वा नाही. आदित्यनाथ म्हणत आहेत की काँग्रेस पक्ष ही देशासाठी मुख्य समस्या आहे. संचारबंदी लादणे त्याच्या 'डीएनए'मध्ये आहे. या पक्षाच्या कार्यप्रणालीचे वर्णन करताना आदित्यनाथ यांनी 'कर्फ्यू' हा शब्द वापरला आहे तर ममता बॅनर्जी दंगलींबद्दल बोलत आहेत. एकंदर प्रकरण तसेच आहे. दंगली होतात तेव्हाच कर्फ्यू लावला जातो. दोघांची वृत्ती आणि उद्दिष्ट एकच आहे. आदित्यनाथ आणि ममता दोघेही समान पद्धती अवलंबत असून दोघांकडूनही शत्रूला लक्ष्य केले जात आहे. मुद्दा असा आहे की दोन्ही ठिकाणी राम आणि दंगलींचा उच्चरवाने उल्लेख होत आहे. आदित्यनाथ राजस्थानमध्ये काँग्रेसवर टीका करताना काँग्रेस गरिबांना उपाशी मारेल, पण दहशतवाद्यांना बिर्याणी खायला देण्याची व्यवस्था करेल, असे म्हणत आहेत. हा उल्लेख पाकिस्तानी दहशतवादी कसाबबद्दल असल्याचे वेगळे सांगायला नको. २६/११ च्या हल्लेखोर कसाबने बिर्याणी खाण्याची इच्छा व्यक्त केल्याची बरीच चर्चा आपण ऐकली आहे. त्या वेळी देशात काँग्रेस आघाडीचे सरकार होते. वास्तविक, कसाबला त्यांच्याच काळातील सरकारने पकडले होते. तुरुंगात काय खायला द्यायचे, हे सरकार ठरवत नसते. तुरुंग न्यायालयाच्या अधीन असतात; परंतु राजकीय भांडवल करताना शत्रूराष्ट्राच्या नागरिकाचाही आधार घेण्याची वेळ येते, हे खरे दुर्दैव आहे.

सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी कसाबने कधीही बिर्याणी मागितली नव्हती किंवा ती त्याला दिली गेली नव्हती, असे स्पष्ट केले असताना आदित्यनाथ अजूनही अशी विधाने करून निकम यांच्या विधानांना छेद देत त्यांच्या देशभक्तीवरही शंका घेतात की काय, असा प्रश्न उपस्थित होतो. राम मंदिरावरून काँग्रेसवर निशाणा साधताना योगी म्हणतात की राम मंदिर बांधणे दूरच; परंतु काँग्रेसने भगवान राम आणि भगवान कृष्ण यांना काल्पनिकच मानले आहे. ममता निवडणूक रॅलीत रामाचे नाव घेतात; पण ते भाजपला साद देण्यासाठी. राम मंदिर उद्घाटन सोहळ्यावर पहिल्यांदा बहिष्कार टाकणाऱ्या ममता म्हणतात की, भगवान राम तुम्हाला दंगल करायला सांगत नाहीत. पण हे लोक त्यांचे नाव घेऊन दंगल करतील. २०२१ च्या पश्चिम बंगाल निवडणुकीपूर्वीही ममतादीदी भाजपवर असेच आरोप करत होत्या. ममता बॅनर्जींचा आरोप आहे की, पश्चिम बंगालमध्ये दंगल घडवण्यासाठी भाजप इतर राज्यातून लोक आणतो. पण या वेळी ममता बॅनर्जी काही नवीन सांगत आहेत. 'एनआयए'च्या पथकाने पूर्व मिदनापूर येथे कारवाई केली, तेव्हा या पथकावर हल्ला झाला. मोदी यांनी त्याचे भांडवल केले. याचा संदर्भ देत ममता म्हणाल्या की, 'एनआयए' म्हणजेच राष्ट्रीय तपास यंत्रणा पाठवून भाजप दंगली घडवू शकतो. ममता बॅनर्जी लोकांना इशारा देतात की १९ एप्रिलला मतदान आहे आणि १७ एप्रिलला ते दंगल घडवतील. भाजपला खडसावताना भगवान राम तुम्हाला दंगल करायला सांगत नाहीत, असे त्या बजावतात. सहा एप्रिल रोजी 'एनआयए'चे पथक २०२२ च्या बॉम्बस्फोट प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पूर्व मिदनापूरमधील भूपतीनगरमधील तृणमूल काँग्रेसच्या नेत्याच्या घरी पोहोचले. मनोब्रता जना आणि बालचंद्र मैती या दोन नेत्यांना तेव्हा अटक केली होती. तिथल्या लोकांनी 'एनआयए' अधिकाऱ्यांवर हल्ला केला. तपास यंत्रणेच्या गाडीवरही विटा फेकण्यात आल्या. 'एनआयए'च्या पथकावर हल्ल्याची ही दुसरी घटना आहे. 'एनआयए'च्या छाप्यामुळे ममता बॅनर्जी नाराज आहेत. निवडणुकीपूर्वी तपास यंत्रणेच्या कारवाईवर त्या प्रश्न उपस्थित करत आहे. मध्यरात्री छापा का, त्याला पोलिसांची परवानगी होती का, असे प्रश्न उपस्थित करत त्या हल्ल्यांचे समर्थन करत आहेत. ममता सांगत आहेत की तिथल्या लोकांनी प्रतिक्रिया दिली तशीच या ठिकाणी कोणी अनोळखी व्यक्ती आली असती तर दिली असती. थोडक्यात, आता भाजपसोबतच विरोधी पक्षांनीही राम मंदिराला निवडणुकीचा मुद्दा बनवायला सुरुवात केली आहे का, हा प्रश्न पडल्याखेरीज राहत नाही. पश्चिम बंगालमध्ये हे सर्व केल्याचा फायदा ममता बॅनर्जींना मिळण्याची शक्यता आहे; पण इतर ठिकाणी भाजपलाच फायदा होईल हे मात्र नक्की.

आजकाल

# हे आमचे राज ठाकरे नव्हेतच...!!

**विजयकुमार काळे**

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यावरच मुख्यमंत्र्यांनी नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याशी घसट वाढवण्यास सुरुवात केली होती. अधूनमधून उपमुख्यमंत्री देवेंद्रजी ही राज यांच्या भेटी घेत होते. अखेर महायुती सरकारला कुणीतरी चालताबोलता ठाकरे हवाच होता. यावर्षी लोकसभा निवडणुका होणार हे ठरलेलेच होते. शेवटचा हल्लाबोल म्हणून शरद पवार यांची राष्ट्रवादी फोडून अजितदादा यांना बरोबर घेऊन इतकेच न्हवे तर त्यांना उपमुख्यमंत्री पद तसेच अर्थ खाते ही देऊन महायुतीने आपला खुंटा बळकट करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु पक्षांतर्गत निवडणूक चाचपणी अहवाल काही केल्या पाहिजे तसे फासे पाडत नव्हते. मग काय केंद्रीय नेतृत्वाची संधान बांधण्यात आले त्यांनी हिरवा सिग्नल दिल्यानंतर राज ठाकरे यांना दिल्लीचे बोलावणे आले. झाले राज दिल्लीला गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना भेटले. या सर्व भेटी सुफळ संपूर्ण झाल्याची खातरजमा दोन दिवसांपूर्वी शिवतीर्थावर झाली.

दरम्याच्या काळात 'पतंगबाजानी' लोकसभेची एक जागा, राजपुत्राला विधानपरिषद आदी मनातले मांडे खाऊ लागले. राज ठाकरे यांच्या नवनिर्माण सेने शिवाय राज्याचे राजकारण पुढेच सरकणार नाही असा शोध काही माध्यमानी लावला. काही माध्यमेही इतकी इरसाल आहेत की गेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत अवघ्या काही जागांवर विजयी झालेल्या मनसे शिवाय शिवसेनेचा महापौर होऊच शकत नाही अशी हाकाटी सुरु केली होती. अगदी त्याच धर्तीवर दक्षिण मुंबईतून बाळा नांदगावकर यांना उमेदवारी बहाल केली. बिचारे नांदगावकर गेल्या अनेक निवडणुकात पराभूत झाले असून (अपवाद फक्त भुजबळ नांदगावकर शिवसेनेतील निवडणूक) काही हितशत्रूनी 'बाळा बाळा पडणार कितींदा, एकदा दोनदा की कायमचाच!!' अशी घोषणा ही तयार केली होती असे लालबाग परिसरात बोलले जात होते. प्रादेशिक राजकीय पक्षांचे भवितव्य हे बऱ्याच अंशी केंद्रीय सत्ता ज्याच्या हाती असते त्या राजकीय पक्षावर अवलंबून असते. शिवसेना प्रमुख स्व बाळासाहेब ठाकरे यांची गोष्ट वेगळी होती. त्यांच्याकडे अफाट करिष्मा असल्याने ते अनेकवर्षे पराभव पचवू शकले, संकटाशी सामना करून त्यांनी शिवसेनेचे सत्व टिकवले होते. परंतु हल्लीच्या कोणच्याच सेनेत ते सत्व दिसत नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागत आहे. राज ठाकरे यांची अनेक धोरणे धरसोडीची असतात हे आता अनेक उदाहरणे देऊन सिद्ध करता येईल. पण त्या तपशीलात जाण्यात आता अर्थ नाही. जाता जाता फक्त उल्लेख परप्रांतीय विरोधाचा करतो. खरं तर या धोरणात खरोखरचं 'दम' होता. जे उत्तरभारतीय येथे दादागिरी करतात त्यांनी तशीच दादागिरी बिहार, आसाम, दिल्ली, पश्चिम बंगाल, गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक, आदी राज्यात करून दाखवावी ना? फार काय दिल्लीत तर बिहारी व उत्तरप्रदेश असे शीतयुद्धच गेली अनेक वर्षे सुरू आहे. आसाम तर या दोघांना जवळ उभाच करत नाही. राज्यातील अनेक नोकऱ्या ही मंडळी मराठी तरुणांकडून हिसकावून घेत आहेत. कमी शिकलेल्या मराठी तरुणांचे काम तर या उत्तर भारतीयांनी हिसकावून घेतलेले आहे. शिवाय राज्यातील उद्योगधंदे केंद्र सरकार गुजरात व अन्य राज्यांकडे वळवत आहे त्याबद्दल खरे तर राज यांनी भाजपच्या नेत्यांना खडसावायला पाहिजे होते. चर्चेत त्यांनी मान डोलावली म्हणजे सर्व त्यांनी मान्य केले असे नाही. जे अमित शहा ठाकरेंना जमीन दाखवा असे म्हणाले होते त्यांची पालखी उचलताना काकांना काय वाटले असेल याचा किंचित सुद्धा विचार केला नाहीत? गेल्या चार वर्षात तरी मोदी यांनी महाराष्ट्रासाठी काही भरीव केलय असं वाटतं नाही. गेल्या १०/१५ वर्षात राज ठाकरे यांचे अनेक शिलेदार त्यांना सोडून गेले आहेत त्याचा त्यांनी कधी गांभीर्याने विचार केला आहे का?'' ''याप्रमाणे नवनिर्माण सेनेने कुणाला वाढायची परवानगी दिली आहे का? याचा विचार राज यांनी जरूर करावा कोण काय आरोप करतो यांच्यावर आमचा विश्वास नाही कारण गेली ४०/४२ वर्षे आम्ही राज यांचे राजकारण आणि इतर सांस्कृतिक कार्य जवळून पहात आहोत त्यांच्या रोजच्या उठण्याबसण्यात आम्ही नसूही पण आम्ही ही त्यांना जवळून ओळखतो. एक-दोन निर्णय वा राजकारणात एक पाऊलही चुकीचे पडले तर होत्याचे न्हवते होते हे मी सांगायला नको. कुसुमाग्रज यांच्या अप्रकाशित साहित्याचे प्रकाशन राज यांच्या हस्ते झाले होते. त्यातील एका कवितेच्या ओळीचा उल्लेख करावासा वाटतो-

**''गाठ गोसाव्याची एका**
**निर्जनात पडे**
**राजरस्त्यावर आता**
**पायचाल अंडे**'' भावी वाटचाल सुखकर होऊ नये म्हणून केंद्राने चलाखीने खेळलेली ही खेळी आहे. गेले दोन दिवस मी नवनिर्माण सेनेच्या अनेक सैनिकांना भेटलो, काहींनी तर मित्र असून बोलायला टाळाटाळ केली. पण जे अनेकजण बोलले ते असेच म्हणाले की, 'शिवतीर्थावर बोलले ते आमचे राज ठाकरे नव्हेतच!!'

लोकसंसद

## हौशे, नवशे, गवशे आणि आयाराम, गयाराम यांची सध्या चलती

देशाच्या १८ व्या लोकसभा निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार मतदानाचा पहिला टप्पा काही दिवसांवर (१९ एप्रिल) आलेला असताना अजूनही सर्वच राजकीय पक्षातील इच्छुक उमेदवारांची अंतिम यादी जाहीर होऊ शकलेली नाही. एकेका जागेसाठी अनेकजण इच्छुक असल्यामुळे अंतिम उमेदवार ठरविण्यासाठी राजकीय पक्षांपुढे पेच पडला आहे. त्यातच लोकसभा निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या हौशे, नवशे, गवशे आणि आयाराम, गयाराम उमेदवारांमुळे या पेचात आणखीनच भर पडली आहे. येनकेनप्रकारेण सत्तेच्या चाव्या आपल्याकडेच असाव्यात असा सर्व पक्षांचा प्रयत्न असल्यामुळे सर्व प्रकारची नीतिमत्ता गुंडाळून निवडून येण्याची क्षमता असलेल्या कोणत्याही उमेदवाराला उमेदवारी देण्याकडे पक्षांचा कल दिसतो आहे. मात्र अशा परिस्थितीत जगातील सर्वात मोठ्या गणल्या गेलेल्या या लोकशाहीच्या उत्सवाकडे तटस्थपणे पाहणारा मतदार कोणाच्या झोळीत आपले मत टाकतो हे ४ जूनला कळणार आहे. तोपर्यंत निवडणुकीच्या निमित्ताने होणारी राजकारणातील सुंदोपसुंदी आणि गटा-गटातील अंतर्गत वाद, कलह पाहण्याशिवाय आपली हाती काहीच नाही.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

मराठी साहित्यिक दिनविशेष

### सोळा एप्रिल

१८३९ : भारतीय वैद्यक शास्त्रविषयक ग्रंथाचे लेखक, वनस्पतीशास्त्रज्ञ आणि समाजसुधारक असलेले सखाराम अर्जुन राऊत यांचा जन्म १८३९ साली झाला. वयाच्या अवघ्या ११ व्या वर्षी अनाथ झाल्याने शिष्यवृत्तीच्या जोरावर शिक्षण पूर्ण केले. ग्रँट मेडिकल कॉलेजमधुन शिक्षण पूर्ण केल्यावर त्याच कॉलेजात प्राध्यापकी करू लागले. याशिवाय वनस्पतीशास्त्राचे प्राध्यापक व्हॉइसरॉयचे सहाय्यक सर्जन, लस टोचणी विभागाचे अधीक्षक ही पदे त्यांनी भुषविली. समाजप्रबोधनासाठी त्यांनी लेखन केले आणि ते स्वखर्चाने प्रसिद्ध केले. त्यांच्या ग्रंथरचनेत वैद्यतत्व, विवाहविज्ञान, बॉम्बे ड्रग, गर्भविद्या व प्रसूतिकरण, गृहिणीकंठभूषण, देवीच्या रोगाचे स्वरुप आणि त्याच्या शमनाचे व प्रतिबंधाचे उपाय आदी ग्रंथ त्यांनी लिहिले. याशिवाय वनस्पतीशास्त्र या विषयावरही लेखन केले. तसेच आयुर्वेदिक औषधांचा प्रचार व्हावा म्हणून त्यावरही ग्रंथरचना केली. याशिवाय ड्रॉसिएना फर्ग्युसन या नव्या संकरित वनस्पतींची निर्मिती आणि 'ड्रॅगन ट्री' या नव्या वनस्पतींचा शोध त्यांनी लावला. विचारांनी ते काळाच्या कितीतरी पुढे होते. त्या काळात एक मुलगी असलेल्या विधवेशी त्यांनी विवाह केला. त्यांची सावत्र मुलगी मुंबईतील णेने पुढे पहिली स्त्री डॉक्टर. 'बॉबे प्लोरा' हे पुस्तक निधनामुळे अपूर्ण राहिले. इंग्रजी राजवटीत ग्रँट मेडिकल कॉलेजातून वैद्यक व प्रसुतिविद्या या विषयाचे अध्यायन ते मराठीतून करत असत. तसेच त्या काळात जे.जे. हॉस्पिटलमध्ये डॉ. हेन्री या सर्जनच्या हाताखाली काम करण्याची संधी लाभलेले राऊत हे नावर पहिले भारतीय डॉक्टर. समाज प्रबोधनासाठी स्वखर्चाने पुस्तक प्रकाशित ला करणाऱ्या डॉ. राऊतांचे १६ एप्रिल १८८५ रोजी निधन झाले. **१८८५ :-** भारतीय वैद्य, वैद्यकशास्त्रविषयक ग्रंथाचे लेखक, वनस्पतीशास्त्रज्ञ आणि समाजसुधारक असलेले सखाराम अर्जुन राऊत यांचे निधन. त्यांच्या ग्रंथरचनेत वैद्यतत्त्व, विवाहविज्ञान, बॉबे ड्रग, गर्भविद्या व प्रसूतिकरण, गृहिणी कंठभुषण, देवीच्या रोगाचे स्वरुप आणि त्यांच्या शमनाचे व प्रतिबंधाचे उपाय आदी ग्रंथ त्यांनी लिहिले. याशिवाय वनस्पतीषास्त्र या विषयावरही लेखन केले. तसेच आर्युर्वेदिक औषधांचा प्रचार व्हावा म्हणून त्यावरही ग्रंथरचना केली. याशिवाय 'ड्रॉसिएना फर्ग्युसन' या नव्या संकरित वनस्पतींची निर्मिती आणि 'ड्रॅगन ट्री' या नव्या वनस्पतींचा शोध त्यांनी लावला. **१९२५:-** लेखिका मालती विनायक मराठे यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'अमरवेल' हा कथासंग्रह, 'सागरकन्या','सोनेरी मासोळी' हे बालकथासंग्रह तसेच 'गंमतगीते' हा बालगीत संग्रह आणि काही चरित्रात्मक पुस्तके, अशी त्यांची साहित्य संपदा. **१९२८:-** तत्त्वचिंतक व साक्षेपी समीक्षक महादेव मल्हार जोशी यांचे निधन. 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदांत' आणि 'स्वामी विवेकानंदाचे वाड्:मयीन विचार' ही त्यांची पुस्तके प्रसिध्द. त्यापैकी दुसऱ्या पुस्तकातील निबंध प्रसन्न भाषा व व्यासंगपूर्ण विवेचन या दृष्टीने लक्षणीय आहेत. **१९३७:-** लेखक रघुनाथ सदाशिव लोणकर यांचा जन्म. कादंबऱ्यासह 'तिसरी मेहुणी' हा विनोदी कथासंग्रह तसेच विनोदी फार्स, एकांकिका त्यांच्या प्रसिध्द. **१९३८:-** श्री समर्थ साहित्याचे अभ्यासक आणि समर्थ चरित्रकार सदाशिव खंडो अळतेकर यांचे निधन. **१९४१:-** लेखिका सुभाषिणी मधुकर कुकडे यांचा जन्म. 'सोनपिसारा' हा काव्यसंग्रह आणि 'आई' हा कथासंग्रह प्रसिध्द. याशिवाय लहान मुलांसाठी कथा, कविता, बडबडगीते, छोट्या नाटिका ह्यांचे विपूल प्रमाणात लेखन. **१९५७:-** स्त्रीला संस्कृतीने शरीराच्या नियतीत जखडून ठेवले असून परंपरेने तिला आदर्श भूमिकांशी बांधून ठेवले आहे, अशी बंधनांची जाणीव देऊन मुक्तीचा ध्यास घेणाऱ्या कवयित्री मल्लिका अमरशेख यांचा जन्म. 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' (आत्मकथा) हे त्यांचे गद्यलेखन सर्वाधिक गाजले, रुढ स्त्री-कल्पनांना थेट धक्का देणारे ते असल्याने वादग्रस्तही ठरले, परंतु मल्लिका यांचा स्वभाव कवयित्रीचाच राहिला. 'वाळूचा प्रियकर', 'महानगर','देहऋतू' हे त्यांचे कवितासंग्रह. त्यांनी कथालेखनही केले आहे. शाहीर अमरशेख यांच्या त्या कन्या आणि कवी नामदेव ढसाळ यांच्या सहचर होत. **१९६५:-** लेखक बी एस कुलकर्णी यांचा जन्म. ह्यांचे 'पक्षी निरीक्षण' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. **१९७५:-** नाट्यलेखक विश्वास विनायक पाताडे यांचा जन्म. 'जुळता काय बघतय','वैल्याची तुटली दोरी खायलो बोंब मारी' या नाटकांशिवाय 'कदाचित','एन्काउंटर','जग दोघांचे', मिळून पाच' एकांकिकाआणि 'शुभ लग्न सावधान' ही मालिका त्यांच्या नावावर आहे. **१९७६:-** चरित्रकार आणि कथाकार नीळकंठ महादेव केळकर यांचे निधन. त्यांनी लेखनाला सुरुवात कथांद्वारे केली. 'जीवनपथ' हा कथासंग्रह देखील आला. परंतु हरी नारायण आपटे आणि भास्करबुवा बखले यांच्या चरित्र पुस्तकांमुळे ते विशेष गाजले. **१९७८:-** शेष स्कंद या नावाने लेखन करणारे समीक्षक स्वातंत्र्यसेनानी खंडेराव त्र्यंबक सुळे यांचे निधन. **२०१५:-** बालसाहित्यिक पु.ग. वनमाळी यांचे निधन. पेशाने शिक्षक असणाऱ्या पु. ग. ची 'आनंदी बाग', 'अनुभव हाच खरा संस्कार', 'मानवतेचा पुजारी', 'शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ', 'ठकास महाठक' हे बालकथासंग्रह. तसेच 'किशोर कुंजातील पशुपक्ष्यांच्या गमती जमती' हा बालकाव्यसंग्रह आदी पुस्तके प्रकाशित. याशिवाय 'शिक्षकांची अध्यापन पूर्वतयारी', 'मतिमंदाच्या कथा व व्यथा', 'जंगलातील पशुपक्ष्यांची जीवन गाणी' ही पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**




# मोदींच्या राज्यात दलितांवर अत्याचार

## मल्लिकार्जुन खरगे यांचे प्रतिपादन



**। नागपूर । प्रतिनिधी ।**

राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या अनुपस्थितीवरून पंतप्रधान मोदींकडून काँग्रेसला कायम लक्ष्य केले जाते. मात्र, आजही आमच्या अनेक लोकांना मंदिरात प्रवेश नाही, सार्वजनिक पाणी स्थळावर बंदी आहे तर, घोडय़ावरून वरात काढली म्हणून दलित मुलाला मारहाण केली जाते. मोदी सरकार दलित विरोधी असल्याने अशा सरकारच्या काळात आम्ही मंदिराच्या उद्घाटनाला कसे जाणार? असा सवाल काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला.

नागपूर लोकसभेचे काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांच्या प्रचारार्थ गोळीबार चौक येथे खरगे यांची सभा झाली. यावेळी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात आदी उपस्थित होते. खरगे म्हणाले, की आम्ही धर्माच्या विरोधी नाही. प्राणप्रतिष्ठेचे काम साधू, संत करतात. मात्र, मोदी नवीन साधू झाले आहेत. कधी समुद्राच्या आजूबाजूला फिरतात तर कधी डुबकी लावताना दिसतात आणि आम्हाला राम विरोधी म्हणतात. अयोध्येला का आले नाही, असा सवाल मोदी करतात. मात्र, दलित विरोधी सरकारच्या काळात आम्ही मंदिराच्या उद्घाटनाला कसे जाणार? असा प्रश्न खरगे यांनी केला. देशातील सर्व दलित, वंचितांना राम मंदिरात प्रवेश मिळेल तेव्हाच मी अयोध्येला जाणार असेही खरगे म्हणाले. नवीन संसद भवनाच्या भूमिपूजनाला माजी राष्ट्रपतींना बोलावले नाही, उद्घाटनाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण दिले नाही. त्यांना राम मंदिराच्या उद्घाटनाला नेले नाही. हा दलित आणि आदिवासी राष्ट्रपतींचा अपमान आहे. मोदींनी मतांचे राजकारण करण्यासाठी खेळ थांबवावे अशी टीकाही खरगे यांनी केली.

## मोहिते पाटलांच्या हातात तुतारी

**। माढा । प्रतिनिधी ।**

धैर्यशील मोहिते पाटील यांनी हातात तुतारी घेऊन शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या पुतण्याने पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने दोन मतदारसंघातील गणितं बदलली आहेत. मोहिते पाटील माढ्यातून लोकसभा निवडणुकीचा अर्ज दाखल करणार आहेत. मोहिते पाटलांनी पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्यामुळे माढा आणि सोलापूर या दोन मतदारसंघातली गणितं बदलली आहे, कारण या दोन मतदारसंघावर मोहिते पाटील घराण्याचा अनेक वर्षांपासून राजकीय प्रभाव आहे. मोहिते पाटील कुटुंबाने ताकदीने भाजपकडून उमेदवारी मिळावी म्हणून प्रयत्न केले होते. माढा लोकसभा मतदारसंघात आता दोन तगडे उमेदवार आमने-सामने येणार आहेत.

## आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मावळ मतदारसंघातील आघाडीचे ठाकरे गटाकडून संजोग वाघेरे पाटील यांनी मागील आठवड्यापासून खालापुर तालुक्यातील गावांना भेटी देण्यास सुरुवात करत मशाल चिन्ह घरोघरी पोचवण्यासाठी काम करत असल्याने यावेळी आघाडीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळत असल्याने रणरणत्या उन्हात सुद्धा खालापुर तालुक्यातील गावागावासह वाड्या, वस्त्यांवर संजोग वाघेरे यांचे जल्लोषात स्वागत होत असून मतदारांकडून त्यांना अधिक पसंती मिळत आहे.

उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी आम्ही एक दिलाने काम करू असे अभिवचन मतदारांनी वाघेरे यांना दिला आहे, ते वडगांव जिल्हा परिषद विभागातील गाव भेटीसाठी आले होते. यावेळी इंडिया आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व मोठ्या संख्येने महिला आघाडी उपस्थित होती.

शुक्रवारी (दि.१२) वडगाव जिल्हा परिषद विभागात असलेल्या गावांना संजोग वाघेरे यांनी भेट देऊन येथील इंडिया आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह मतदारांचे मनोबळ वाढविण्यांसाठी तुपगाव, पाली, सारंग, आसरोटी, टेंभरी, वयाल, वडगाव, वाशिवली, बोरिवली, कैरे, वाणीवली, तळवली, लोहोप, कोपरी, इसांबे, आंबिवली, माजगाव, वारद, पौद, आसरे, आसरेवाडी, धारणी, नडोदे, निगडोली, माडप, खरसुंडी, कुंभीवली, वडवल, ताबाटी, खिरकिंडी, डोनवत, वनवठे, सावरोली, धामणी गावांना भेट दिली. या प्रचार दौरास ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

## राणांना निवडणूक आयोगाचा दणका

**अमरावती :** प्रचाराचं बॅनर लावण्यासाठी ग्रामपंचायतीची परवानगी न घेतल्यामुळे निवडणूक आयोगाकडून भाजपा उमेदवार नवनीत राणा यांचं बॅनर हटवण्यात आलं आहे. अमरावती जिल्ह्यातल्या चांदूर बाजार तालुक्यातील तळवेल गावात ही घटना घडली आहे. तळवेल ग्रामपंचायत आणि निवडणूक आयोगाकडून ही संयुक्त कारवाई करण्यात आली आहे. भाजपच्या उमेदवार राणा यांच्या प्रचाराचे बॅनर लावण्यात आले होते. मात्र हे बॅनर लावताना तळवेळ ग्रामपंचायतीची कुठलीही परवानगी घेण्यात आली नव्हती. त्यामुळे हे बॅनर हटवण्यात आले आहे. निवडणूक आयोग आणि ग्रामपचांयतीकडून संयुक्त कारवाई करण्यात आली आहे. आघाडीकडून काँग्रेसचे बळवंत वानखडे हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. सध्या हा लोकसभा मतदारसंघ चांगलाच चर्चेत असून, या निवडणुकीकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

## वे|ध|क

### अपयश लपविण्यासाठी नारा

**चंद्रपूर :** देशातील नागरिकांना दिलेल्या आश्वासनांपैकी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षाच्या पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात एकही काम, आश्वासन पूर्ण केले नाही. महागाई, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू, विदेशातील काळा पैसा परत आणू, अर्थव्यवस्था हे सर्व जैसे थे आहे. या सर्व आश्वासनांचे काय झाले यावर कुणी प्रश्न विचारू नये म्हणून अब की बार ४०० पार हा नवीन जुमला मोदींनी आणला आहे.

### अंधारे यांचा भाजपवर हल्लाबोल

**पिंपरी :** भ्रष्टाचार आणि परिवारवादावर मोठ्या गप्पा या निवडणुकीत भाजप मारत आहे. पण, जितका मोठा भ्रष्टाचारी, तितका मोठा त्याचा प्रवेश भाजपमध्ये होतो, अशी टीका ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अंधारे आणि मावळ उमेदवार संजोग वाघेरे यांनी पिंपरी येथील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

### दिग्गजांची राहणार उपस्थिती

**उस्मानाबाद :** धाराशिव लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता महाविकास आघाडीच्या वतीने शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार ओमप्रकाश राजेनिंबाळकर हे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी महाविकास आघाडीचे सर्व ज्येष्ठ नेते उपस्थित राहणार असून शिवसेना ठाकरे गटाचे माजी मंत्री व युवासेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार, तसेच काँग्रेस आय पक्षाचे माजी मंत्री तथा आमदार अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी धाराशिव यांच्याकडे नामनिर्देशन दाखल करण्यात येणार आहे.

## कार्यकर्ते ‘मनसे’ नाराज

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत यांनी महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासंदर्भात पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्या. स्वत: चा आब राखून महायुतीमधील उमेदवारांचा प्रचार करा अशा सूचना यांनी मनसे पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. मात्र, महायुतीच्या बॅनरवर यांचा फोटो पाहून मनसैनिक नाराज झाले आहेत.

भाजप आणि मनसेत राज ठाकरे यांच्या फोटोवरून नवा वाद निर्माण झाला आहे. यांचा फोटो बॅनरवर सन्मानजनक ठिकाणी लावा, अशी मागणी मनसे कार्यकर्त्यांनी केली आहे. मनसे सरचिटणीस नयन कदम यांनी भाजप पदाधिकाऱ्यांना यावरुन सुनावले आहे. महायुतीत सन्म ानजनक वागणूक देण्याची विनंती त्यांनी केली. सन्मानजनक फोटो असला पाहिजे. महायुतीच्या संकल्प मेळाव्याच्या बॅनरवरून मनसेने नाराजी व्यक्त केली. बॅनरवर फोटो लावायचा असेल तर सन्मानजनक ठिकाणी लावा अन्यथा लावु नका, असे मनसेने म्हटले आहे. उत्तर मुंबईतील उमेदवार पियुष गोयल यांच्या महायुती संकल्प मेळाव्यातील बॅनरमुळे मनसेने नाराजी व्यक्त केली.

## भाजपाचा एक गट प्रचारापासून अलिप्त

**एरंडोल :** तालुक्यातील भाजप पदाधिकाऱ्यांमधील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले असून पक्षाचे दोन माजी नगराध्यक्ष, दोन माजी उपनगराध्यक्ष, अनेक माजी नगरसेवकांसह अनेक पदाधिकारी प्रचारापासून अलिप्त आहेत. भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये असलेले मतभेद मिटवण्याचे आव्हान पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसमोर उभे राहिले आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराबाबत विश्वासात घेतले जात नसल्यामुळे पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. शहरासह ग्रामीण भागात भाजपचे संघटन मजबूत असले तरी मागील तीन वर्षांपासून प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये असलेले मतभेद मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत.

## ठाण्यात भाजप-शिवसेनेमध्ये रस्सीखेच सुरू

**। ठाणे । प्रतिनिधी ।**




ठाणे लोकसभा भाजपसाठी वेगळे ठिकाण आहे. त्यामुळे ठाणे लोकसभेसाठी भाजपचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा टोकाचा आग्रह करत आहेत. ठाण्यात कधीकाळी भाजपचे रामभाऊ म्हाळगी, रामभाऊ कापसे हे खासदार होते. सध्या ठाण्यात आमचे आमदार, नगरसेवक, कार्यकर्त्यांची फळी उभी राहिली आहे. त्यामुळे ठाणे लोकसभेच्या उमेदवारीसाठी आमची मागणी आहे, तो कार्यकर्त्यांचा अधिकार आहे असे सूचक वक्तव्य भाजपचे विधान परिषदेचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी केले. गेल्याकाही दिवसांपासून ठाणे लोकसभेच्या उमेदवारीवरून भाजप आणि शिवसेनेमध्ये रस्सीखेच सुरू आहे. दरेकर यांच्या या विधानाने ठाणे लोकसभेसाठी भाजपकडून जोरदार प्रयत्न सुरू असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांच्यासाठी ठाणे लोकसभा अतिशय महत्त्वाची मानली जाते. गेल्याकाही वर्षांपासून ठाणे जिल्ह्यात भाजपचे बळ वाढत असल्याने आता ठाणे लोकसभेच्या उमेदवारीवर भाजपने दावा करण्यास सुरूवात केली आहे. महायुतीच्या माध्यमातून शहरात शिंदे याची शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटांच्या बैठका घेतल्या जात आहे. परंतु उमेदवार निश्चित होत नसल्याने शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. शिंदे गटाकडून आ. प्रताप सरनाईक, माजी आ. रविंद्र फाटक आणि माजी महापौर नरेश म्हस्के यांची नावे चर्चेत आहेत. तर भाजपकडून माजी खा. संजीव नाईक आणि ठाण्याचे आ. संजय केळकर यांची नावे पुढे येत आहेत. संजीव नाईक यांनी नवी मुंबई, ठाणे, मिरा भाईंदर भागात पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेण्यासही सुरूवात केली आहे. तर संजय केळकर यांनी पक्षाने संधी दिली तर मी स्वतः आनंदाने लढायला तयार असून कार्यकर्ते मला नक्कीच मदत करतील, अशी प्रतिक्रिया दिली होती. त्यामुळे शिंदे गटाच्या इच्छुकांमध्ये काहीशी अस्वस्थता पसरली आहे. आता विधान परिषदेचे गटनेते प्रवीण दरेकर यांच्या विधानानेही चर्चा रंगली आहे.

## नाशिकमध्ये आजी-माजी पालकमंत्र्यांमध्ये वर्चस्वाची लढाई

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

नाशिक लोकसभा मतदारसंघाचा विषय महायुतीतील तीनही पक्षांच्या आजी-माजी पालकमंत्र्यांनी प्रतिष्ठेचा केला आहे. नाशिकवर आपले वर्चस्व अबाधित राखण्यासाठी त्यांच्यात सुप्त संघर्ष चालू आहे. जागेचा तिढा सुटण्याची घटिका समीप येत असताना शाब्दिक द्वंद्व वाढले आहे. नाशिकची जागा शिवसेनेला (शिंदे गट) मिळायला हवी, हा नाशिककरांचा आग्रह असल्याचा दावा पालकमंत्री दादा भुसे यांनी करताच तो माजी पालकमंत्री तथा राज्याचे अन्न व



नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी लगेचच खोडून काढला. अधिकृतरित्या निर्णय जाहीर होईपर्यंत महायुतीमधील प्रत्येक पक्षाला ही जागा मागण्याचा अधिकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माजी पालकमंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक हा भाजपचा बालेकिल्ला असल्याचे सांगत आपल्या पक्षाचा दावा सोडलेला नाही.

महायुतीत अटीतटीच्या संघर्षाने नाशिकच्या जागेचा पेच सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. शिवसेना शिंदे गटाच्या विरोधामुळे ही जागा हिसकावून घेण्याचे भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मनसुबे यशस्वी होतील की नाही ते गुलदस्त्यात आहे. ही जागा आपल्या पक्षाकडे राखण्यासाठी तीनही पक्षांचे प्रमुख नेते अर्थात आजी-माजी पालकमंत्र्यांचा आटापिटा सुरू असून जिल्ह्यावर आपला प्रभाव राखण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. जोपर्यंत अधिकृत निर्णय जाहीर होत नाही, तोपर्यंत महायुतीत प्रत्येक पक्षाला ही जागा मागण्याचा अधिकार आहे. या संदर्भात घोषणा होईल, तेव्हा सर्व पक्ष एकत्रितपणे काम करतील, असे त्यांनी नमूद केले. भाजपही या जागेसाठी सुरुवातीपासून आग्रही आहे. महाजन यांनी भाजपचे शहरात तीन आमदार आणि ७० नगरसेवक असल्याने नाशिक हा पक्षाचा बालेकिल्ला असल्याचा दाखला वारंवार दिला आहे. त्यामुळे पदाधिकाऱ्यांना ही जागा भाजपला मिळावी, असे वाटते, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

## सिनेअभिनेता गोविंदाचा रोड शो फसला

**। वाशीम । प्रतिनिधी ।**

सिनेअभिनेता गोविंदा वाशीम शहरात येणार असल्याने त्याला पाहण्यासाठी लोकांची प्रचंड गर्दी होईल, असा अंदाज होता. मात्र, महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या रोड शोला अत्यल्प प्रतिसाद मिळाला होता.



गोविंदा बाहेर कमी आणि गाडीतच जास्त असल्यामुळे त्याला पाहण्यासाठी आलेल्यांना देखील गोविंदा बाहेर या म्हणून नारेबाजी करावी लागली. तरीही तो बाहेर न आल्याने अनेकांचा हिरमोड झाल्याचे दिसून आले.

रोडशोला सिव्हिल लाईन येथून प्रारंभ झाला. सिव्हिल लाईन मार्गे बस स्थानक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पाटणी चौक या रस्त्यावरून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत रोडशो झाला. या रोडशो दरम्यान गोविंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करेल अशी आशा होती. लोकांनाही तसेच वाटत होते. मात्र गोविंदाने बाहेर न येता गाडीतूनच नमस्कार केल्याने शहरात नाराजीचा सूर उमटला.

## ए. वाय. पाटील यांचा शाहू महाराजांना पाठिंबा

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ए. वाय. पाटील यांनी रविवारी (दि.१४) शेकडो कार्यकर्त्यांसह शक्ती प्रदर्शन करत शाहू महाराज यांना पाठिंबा दर्शवला. देशातील वाढत चाललेली हुकूमशाही रोखण्यासाठी आणि संविधान वाचवण्यासाठी आघाडीला पाठिंबा देत असल्याचे पाटील यावेळी म्हणाले.



गेल्या काही दिवसांपासून महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी पक्षाच्या कोल्हापूर जिल्ह्याच्या नेत्यांवर नाराज असलेले पाटील यांनी राधानगरी आणि भुदरगड तालुक्यातील तीन हजार कार्यकर्त्यांसह शक्ती प्रदर्शन करून महाराजांना पाठिंबा दिला आहे.

## विलासराव जगताप यांचा राजीनामा

**सांगली:** भाजपचे जतचे माजी आ. विलास जगताप यांनी भाजपच्या सदस्यपदाचा राजीनामा दिला आहे. जगताप यांनी विशाल पाटलांना पाठिंबा जाहीर केला आहे. काहीच दिवसांपूर्वी संजय राऊतांनी जगताप यांची भेट घेत चंद्रहार पाटील यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याची विनंती केली होती. जगताप यांनी विशाल पाटलांना पाठिंबा जाहीर केल्यामुळे खासदार संजयकाका पाटील यांची डोकेदुखी वाढणार आहे.

## साताऱ्याची जागा घड्याळ की कमळाला?

### महायुतीच्या उमेदवाराचे घोंगडे अद्याप भिजत

**। सातारा । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला अवघे चार दिवस उरले असतानाही महायुतीच्या उमेदवाराचा तिढा सुटलेला नसल्याने मतदारांबरोबरच कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. महायुतीची आज मुंबईत होणाऱ्या बैठकीत साताऱ्याची जागा अजित पवार गट की भारतीय जनता पक्षाला तसेच उमेदवार कोण? यावर निर्णय होण्याची शक्यता आहे.



सातारा लोकसभा मतदारसंघातून उमेदवार अर्ज भरण्याची प्रक्रियाही मंगळवारी (दि. १२) पासून सुरू झाली आहे. महाविकास आघाडीने आ. शशिकांत शिंदे यांची उमेदवारी जाहीर केली. आज पक्षाध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत अर्जही भरला आहे. महायुतीच्या उमेदवाराचे घोंगडे अद्याप भिजत पडले आहे.

निवडणूक जाहीर झाल्यानंतर महायुतीकडून खा. उदयनराजे भोसले, पुरुषोत्तम जाधव, नरेंद्र पाटील यांनी उमेदवारीची इच्छा व्यक्त केली. त्याचबरोबर अजित पवार गटानेही ही जागा आपल्यालाच मिळावी, अशी आग्रही मागणी लावून धरली आहे. त्यांच्याकडून नितीन पाटील यांचे नाव उमेदवारीसाठी आघाडीवर आहे. उमेदवारी अजित पवार गट की भाजपला, हे ठरले नसले तरी खा. उदयनराजे भोसले या जागेसाठी भाजपकडून निवडणूक लढण्यास आग्रही आहेत. त्यासाठी त्यांची मुंबई व दिल्लीवारीही झाली. उदयनराजेंनी प्रत्यक्ष प्रचाराला सुरुवात केली. मतदारसंघातील बहुतांश गावांचा त्यांचा फेरा पूर्ण झाला आहे. परंतु, आजही महायुतीच्या उमेदवारीचे कोडे सुटले नाही.

## वंचितचा जाहीरनामा प्रकाशित

**। अकोला । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षानी आपला जाहीरनामा प्रकाशित करत मतदारांना साद घातली आहे. अशातच वंचित बहुजन आघाडीनेही आपला जाहीरनामा प्रकाशित केला आहे. वंचितचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी अकोला येथे पत्रकार परिषद घेऊन पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित करत अनेक मुद्यांवर भाष्य केले आहे.

वंचितच्या जाहीरनाम्याचे वैशिष्ट्य म्हणजे आता एनआरसी आणि सीएए कायद्यांसंदर्भात मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. हे कायदे पूर्णपणे असंवैधानिक आहे. हा कायदा मुस्लिमांच्या विरोधात आहे असे दाखवले जात आहे. पण त्याचा सर्वात मोठा परिणाम हिंदू समाजातील जुन्या काळात ज्यांना पेंढारी म्हटले जात होते आणि आता ज्याला विजेएनटी आपण म्हणतो, त्यांच्यावर होणार असल्याचे आंबेडकर म्हणाले. भाजप इथल्या हिंदू मतदारांना फसवत असून एनआरसी आणि सीएए कायदा मुस्लिमांच्या विरोधात असल्याचे भासवण्यात येत असले तरी प्रत्यक्षात ते देशातल्या २० टक्के हिंदू समाजाच्या विरोधात असल्याचेही या जाहीरनाम्यात म्हटले आहे.

## रत्नागिरी-सिंधुदुर्गात होणार प्रतिष्ठेची लढाई

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात अंतिम चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. शिवसेनेने खा. विनायक राऊत यांना उमेदवारी जाहीर केली आहे. महायुतीकडून केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि मंत्री उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत यांच्या नावाची चर्चा आहे. मात्र, राणे यांनाच उमेदवारी मिळणार, अशी अटकळ बांधून भाजपच्या कार्यकर्त्यांनी प्रचाराच्या कामाला सुरुवात केली आहे.**

या मतदारसंघात बेरोजगारी,



रिफायनरीसह विविध प्रकल्प, जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था, महागाई यांसह अनेक मुद्दे प्रचारात महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. नारायण राणे यांना उमेदवारी मिळाल्यास त्यांचा सामना राऊत यांच्याशी असेल. त्यामुळे या मतदारसंघातील लढत प्रतिष्ठेची होईल, असे सध्याचे चित्र आहे. हे दोघेही मराठा समाजाचे आहेत. आरक्षणावरून मराठा समाजात नाराजी आहे. मराठा समाजाचे काही नेते वगळता ही नाराजी कोणी थेट बोलून दाखवीत नसले तरी हा मुद्दा सत्ताधाऱ्यांसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. बेरोजगारी आणि महागाईमुळे जनमानसांत प्रक्षोभ आहे.

जिल्ह्यात यात शाश्वत विकासाची उणीव आहे. जिल्ह्यातील आंबा बागायतदार हापूसला हमीभाव मिळावा म्हणून आग्रही आहेत तर काजूला २०० रूपये हमीभाव मिळावा म्हणून काजू बागायतदार आग्रही आहेत. या बागायतदारांच्या समस्या सोडविण्यात सत्ताधारी अपयशी ठरले आहेत. त्याचबरोबर विरोधकांनीही या दोन्ही महत्त्वपूर्ण घटकांनी अपेक्षित पाठिंबा दिलेला नाही. मराठा, मुस्लीम, धनगर आरक्षणावरून या सर्व घटकांमध्ये नाराजी आहेच. रत्नागिरी -सिंधुदुर्ग मतदारसंघात २०१९ मध्ये विनायक राऊत आणि डॉ. नीलेश राणे यांच्यामध्ये लढत झाली होती. राऊत यांनी शिवसेना -भाजप युतीकडून लढविली होती तर डॉ. राणे यांनी स्वाभिमान पक्षातून उभे होते. या लढतीत राऊत यांनी बाजी मारली होती.

### सभा, बैठकांवर भर

**राऊत यांची प्रचाराची पहिली फेरी अंतिम टप्प्यात आहे. त्यांनी आतापर्यंत खळा बैठकांवर भर दिला. राणे हेच उमेदवार गृहीत धरून ते टीका करीत आहेत. गावागावांत जाऊन त्यांनी लोकांसमोर त्यांची भूमिका मांडली आहे. दुसरीकडे राणे यांचे नाव अजूनही निश्चित झाले नसली तरी आपल्यालाच उमेदवारी मिळणार, असा विश्वास त्यांना आहे. त्यामुळे तालुकानिहाय महत्त्वाच्या कार्यकर्त्यांच्या सभा घेण्यास त्यांनी सुरुवात केली आहे.**

**निवडक**

### चिरनेरला रामनवमीचा उत्सव

**चिरनेर :** चिरनेरमधील पाडा व तेलीपाडा ग्रामस्थांच्यावतीने दि.१६ ते १८ एप्रिल या कालावधीत श्री रामनवमी जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (दि.१६) बाल कीर्तनकार आश्लेषा अजित केणी हिचे कीर्तन होणार आहे. बुधवारी (दि.१७) मुख्य दिवशी सकाळी प्रभू श्री रामचंद्रांचा अभिषेक होईल व गुरुवारी (दि.१८) रात्री दहा वाजता प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत.

### अनिरुध्द उपासना पालखी

**नागोठणे :** नागोठण्यातील प्रभू आळी भागातील सद्गुरू श्री अनिरूध्द उपासना केंद्रातर्फे रविवारी (दि.१४) आयोजित केलेला श्री अनिरूध्द आनंदी उत्सव पालखी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा पालखी सोहळा नागोठण्यातील विविध भागांतून फिरविण्यात आला. श्री अनिरूध्द आनंदी उत्सव पालखी नागोठण्यातील खडक आळी भागामध्ये श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास केंद्रासमोर पालखीचे स्वागत केले. यावेळी उपस्थित सर्वांनी पालखीचे दर्शन घेतले.

### गुळसुंदे येथे सामाजिक उपक्रम

**रसायनी :** गाडगीळ गुरुजी सामाजिक व शैक्षणिक संस्था गुळसुंदे यांच्या माध्यमातून मेडिकल कॅम्प, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शैक्षणिक व वैद्यकीय मदत, शस्त्रक्रियांसाठी मदत, निराधार महिलांच्या लेकींच्या विवाहासाठी मदत इत्यादी उपक्रम दरवर्षी राबवले जातात. यावर्षी व्हीस्टा प्रोसेसफुड या कंपनीच्या सीएसआर फंडाच्या मदतीतून आदिवासींसाठी व आर्थिक दृष्ट्या सक्षम नसणाऱ्या काही गरजवंत कुटुंबांसाठी सार्वजनिक शौचालय बांधून देणे हा उपक्रम राबविण्यात आला.

### मतदार जनजागृती सायकल रॅली

**मुरूड :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या निवडणुकीकरिता मतदानाची टक्केवारी वाढावी, मतदान करताना मतदार यांनी कुठल्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करावे व निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजवावा, यासाठी निवडणूक आयोग व जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रम राबविण्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा व सफाई कर्मचारी यांनी सायकलला जनजागृतीपर संदेश लावून शहरात सायकल रॅली काढण्यात आली.

### जबरी चोरांना अटक

**कर्जत :** पोलीसांनी जबरी चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक करून गुन्ह्यातील २ लाख २६ हजार ५०० रूपये किंमतीचा मुद्येमाल मुळ मालकाला परत केला आहे. डिसेंबरमध्ये कर्जत येथील शाळेत सकाळी मुलांना सोडण्यासाठी आलेल्या तीन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने दोन अज्ञात चोरट्यांनी मोटारसायकलवरून येऊन जबरीने खेचून चोरी करून पसार झाले होते. गोपनीय बातमीदाराच्या मदतीने गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आले.

# साईडपट्ट्या भरण्यास सुरुवात

## सार्वजनिक बांधकाम खात्याने घेतली दखल

**। कोर्लई । वार्ताहर ।**
**मुरूड तालुक्यातील मुख्य रस्त्याच्या होत असलेल्या डांबरीकरणात दुतर्फा असलेल्या साईडपट्ट्या न भरल्यामुळे दुचाकी अपघातात वाढ होत असल्याचे समोर येत असून नुकताच एका दुचाकीस्वाराचा जीव जाता जाता वाचला आहे. त्यामुळे नवीन रस्त्याच्या साईडपट्ट्या लवकरात लवकर भरण्याची मागणी वाहन चालकांकडून होत असून या बातमीचे वृत्त कृषीवलमध्ये प्रसिद्ध करण्यात आले होते. अखेर याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेत साईडपट्ट्या भरण्यास सुरुवात केली.**



साळाव-मुरूड-आगरदांडा रस्त्याचे डांबरीकरणाचे काम जोरदार चालू आहे.

परंतु, हे रस्ते करत असताना रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या साईडपट्ट्या काही ठिकाणी सहा इंचापेक्षा जास्त खोल झाल्याने त्या धोकादायक ठरत आहेत.

यामुळे दिवसात एकतरी अपघात होत आहे. हे रस्ते करत असताना ताबडतोब साईडपट्ट्या भरणे गरजेचे आहे. तसेच, हे बनविलेले रस्ते अरुंद असल्याने अचानक समोरून मोठी गाडी आली की दुचाकीस्वारांना रस्त्याच्या खाली उतरावे लागत आहे. पण या साईडपट्ट्या ६ ते ८ इंच खोल असल्याने दुचाकी घसरून अपघात होत आहेत. याबाबतचे वृत्त कृषीवलमध्ये प्रसिद्ध होताच मुरुडच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकारी वर्गाने दखल घेऊन या रस्त्यावरील साईडपट्ट्या भरण्यास नुकतीच सुरुवात केली असल्याने वाहन चालकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

### नंदू पवार यांचे निधन

**खांब :** रोहा तालुक्यातील बाहे गावचे शेतकरी तसेच वारकरी संप्रदायाचे पाईक नंदू सहदेव पवार यांचे शनिवारी (दि.१३) राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी ते ८० वर्षांचे होते.



नंदू पवार यांनी आपल्या हयातीत शेती व्यवसाय सांभाळून सामाजिक कार्यात सक्रीय राहून समाज व गावासाठी खुप मोलाचे योगदान दिले. तसेच, परिवारावर अतोनात प्रेम करून आपली मुले व नातवंडे यांना चांगले सुसंस्कारित केले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी सोमवारी (दि.२२) तर अंतिम धार्मिकविधी विधी बुधवारी (दि.२४) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली.

# विवाहित महिलेचा ऐवज लंपास

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत शहरातील मुद्रे येथे राहणाऱ्या एका महिलेला चार अनोखी महिलांनी बोलण्यात गुंतवून त्यांच्या जवळील पर्स आणि मोबाईल फोन लंपास करण्याची घटना घडली आहे. दिवसा ढवळ्या शहरातील गर्दीच्या भागातून महिलेच्या जवळील पर्ससह मोबाईल हिसकावून घेतल्याने चोरट्यांची दहशत एवढी वाढली आहे, त्याबद्दल भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कर्जत शहरातील मुद्रे भागात राहणाऱ्या स्वाती वनगे या शनिवारी (दि.१३) दुपारी दोनच्या सुमारास ब्युटी पार्लरमध्ये गेल्या होत्या. त्यावेळी तेथे चार अनोळखी महिला आल्या. त्या महिलांनी वनगे यांच्याशी गप्पा मारण्याचा बहाणा केला. त्या चार महिलांनी वनगे यांना बोलण्यात गुंतवून त्यांच्या जवळील पर्ससह २० हजार रुपये किंमतीचा मोबाईल फोन घेऊन पळ काढला. त्या पर्समध्ये क्रेडिट कार्ड, रोख तीनशे रुपये तसेच काही ओळखपत्रे होती.

याबाबत वनगे यांनी कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी पार्लरच्या बाजूच्या शोरूममधील सिसी टिव्ही फुटेज तपासले. त्यात चार महिला दिसत असून त्यांच्याबरोबर दोन मुलं असल्याचे दिसून येते आहे. मात्र, अद्याप या प्रकरणी कोणालाही ताब्यात घेण्यात आले नसून महिला देखील गुन्हे काम करण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या आखत असल्याने सर्वांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# नवघरकर डॉक्टर व परिचारिकांच्या प्रतिक्षेत




## ■ जिल्हा आरोग्य विभागाचे दुर्लक्ष

**। उरण । वार्ताहर ।**
रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या उदासीन धोरणामुळे मागील वर्षापासून नवघर येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र हे डॉक्टर व परिचारिकांच्या प्रतिक्षेत आहे. त्यामुळे उरण तालुक्यातील खेडेगावातील रुग्णांना आपला वेळ, पैसा वाया घालवून उपचारासाठी खाजगी रुग्णालयात ये-जा करावी लागत आहे.

रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन सदस्य विजय भोईर यांनी आपल्या नवघर या जिल्हा परिषदेच्या मतदार संघातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या फंडातून सुमारे ४८ लाख रुपये खर्च करून नवघर ग्रामपंचायत हद्दीत २०२२-२३ या वर्षात प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची उभारणी केली. मात्र, या उपकेंद्रात रिक्त असलेली समूपदेश अधिकारी, परिचारिकापदे मागील वर्षांपासून भरली गेली नाहीत. त्यामुळे एकच आरोग्य सेवक नवघर, पागोटे, भेंडखळ, बोकडविरा, फुंडे, नवीन शेवा, डोंगरी, पाणजेसह इतर ग्रामपंचायत हद्दीतील एकूण १० गावातील २१ हजार ४६९ लोकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम करत आहे. त्यामुळे रुग्णांची गैरसोय निर्माण होत आहे.

तरी शासनाच्या निकषांवर आधारित आवश्यक असलेली डॉक्टर, समूपदेश अधिकारी, परिचारिका आणि आरोग्य सेवकांची रिक्त पदे भरण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नवघर गावातील सामाजिक कार्यकर्ते नरेश भोईर यांनी केली आहे.

### ज्युतिका भोईरला सरकारची डॉक्टरेट

**उरण :** उरण पंचायत समितीचे वरिष्ठ सहाय्यक व भेंडखळ गावचे सामाजिक कार्यकर्ते कैलास काळूराम भोईर यांची सुकन्या डॉ. ज्युतिका योगिता कैलास भोईर हिने भारत सरकारच्या डायरेक्टरेट जनरल ऑफ फॉरेन ट्रेड (डीजीएफटी) द्वारे इम्पोर्ट-एक्स्पोर्ट मॅनेजमेंट या परीक्षेत उत्तीर्ण होऊन तिने उरण तालुक्यासह भेंडखळ गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. यापूर्वी तिने लॉजिस्टिक अँड सप्लाय चेन मॅनेजमेंटमध्ये उरण तालुक्यातील भेंडखळ गावात पहिली डॉक्टरेट होण्याचा मान संपादित केला आहे. डॉ. ज्युतिका भोईरवर उरण तालुक्यात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# प्रेरणा सुतारची अव्वल कामगिरी



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**
रायगड जिल्हा परिषद व अक्षरशिल्प हँडरायटिंग ॲकॅडमी महाड संचलित हस्ताक्षर सुधार प्रकल्प २०२३-२४ हा उपक्रम रायगड जिल्ह्यातील महाड, पोलादपूर आणि माणगाव तालुक्यातील ८२ प्राथमिक शाळेत राबविण्यात आला. यामध्ये ४,५४५ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता.

या उपक्रमात माणगाव तालुक्यातील प्राथमिक शाळा विळे येथील विद्यार्थी सहभागी झाले होते. या ॲकॅडमीच्यावतीने विळे समन्वयक म्हणून प्रेरणा सोपान सुतार हिची निवड करण्यात आली होती. प्रेरणा सुतार हिने या विद्यार्थ्यांचे अक्षर सुधारण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन करून सराव घेतला, त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात कमालीची सुधारणा झाली. तिच्या या कार्याची दखल घेऊन अक्षरशिल्प हँडरायटिंग ॲकॅडमी महाड यांच्यातर्फे माणगाव तालुक्यातील उत्कृष्ट समन्वयक म्हणून प्रेरणा सुतार हिने प्रथम क्रमांक पटकावला. त्यामुळे तिला अक्षरशिल्प हॅन्डरायटिंग ॲकॅडमीचे संस्थापक नरेंद्रजी महाडिक, प्रियांका महाडिक, चंदन तोडणकर आणि अक्षरशिल्प परिवार आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत गौरवपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# टेलीग्रामवरून लाखोंची फसवणूक

**। उरण । वार्ताहर ।**
ऑनलाईन टास्क पुर्ण करून पैसे कमविण्याच्या अमिषापाई एका व्यक्तीला तब्बल १९ लाख ४३ रूपये फसविल्याची घटना न्हावाशेवा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. कस्थाला ससीकुमार (३४) रा. उलवे असे या फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी न्हावाशेवा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कस्थाला ससीकुमार यांना टेलीग्रामवरून हॉटेल बुकींग करण्याच्या प्रिपेड टास्क असून त्यामध्ये तुम्ही गुंतवणूक करून टास्क पुर्ण केल्यास तुम्हाला चांगला मोबदला मिळेल असा मेसेज आला. हा मेसेज वाचून एका वेबसाईटवर खाते उघडून टास्क पुर्ण करण्यासाठी आपल्या खात्यावरून पैसे भरण्यास सांगितले. सुरूवातीला कस्थाला यांना त्यांच्या वॉलेटमध्ये काही फायदा झाल्याचे दाखविण्यात आले. आणि काही पैसे त्यांच्या खात्यात जमा झाले. त्यानंतर या व्यवसायात चांगला नफा मिळत असल्याचे दिसल्यानंतर कस्थाला यांनी २६ मार्च पासून ते ८ एप्रिलपर्यंत एकूण १९ लाख ४३ हजार ३८५ रूपये वेगवेगळ्या बँक खात्यावरून त्यांनी दिलेल्या खात्यात भरले.

त्यानंतर हॉटेल बुकींग टास्क पुर्ण केल्यावर त्यांच्या नफ्याची रक्कम काढण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले असता त्यांना ते काढता येत नव्हते. त्यानंतर त्यांनी संबधीत व्यक्तींना फोन करून त्यांना विचारण्याचा प्रयत्न केला असता त्यांना काहीही उत्तर मिळाले नाही. त्यामुळे कस्थाला ससीकुमार यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले आणि त्यांनी याबाबत न्हावाशेवा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**सुतारवाडी :** केंद्र शाळा कुडली येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांना भेटवस्तू म्हणून राधा कृष्णाची प्रतिमा देऊन सर्व शिक्षकांचे स्वागत केले. मुख्याध्यापिका म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना तुम्ही पुढे शिकून मोठे झाले तर आम्हाला खूप आनंद होईल. अशा भावना व्यक्त केल्या व निरोप समारंभाची सांगता केली. या समारंभानिमित्त सुशीला म्हात्रे, सुचिता रामधरणे, मोहन राठोड इत्यादी उपस्थित होते.



● मुरूड जंजिरा समुद्रकिनारी ताजी मासळी विकत घेण्यासाठी पर्यटक किनाऱ्यावर मासेमारी करून येणाऱ्या बोटींची वाट पाहत आहेत. ताजी मासळी आली की लिलावात घेऊन ती खाण्याचा मनसोक्त आनंद घेत असतात. (छाया: सुधीर नाझरे)

### महाडमध्ये रक्तदान शिबीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग संघटना दरवर्षी राष्ट्रीय विचारधारेच्या आधारे रक्तदान शिबीर तसेच महिलांसाठी वेगवेगळे उपक्रम व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्राधान्य देणारे कार्यक्रम आयोजित करीत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त (दि.१४) महाड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात राजेश सुर्वे, आनंद घाडगे, सुमित मोरे, शैलेश गायकवाड, संतोष हाटे, वैभव कांबळे, गोपाळ कांबळे, निलेश पवार व समाजातील मान्यवर मंडळी यांनी या रक्तदान शिबिरात भेट देऊन रक्तदात्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचा प्रयत्न केला. यावेळी सचिन खोपडे, प्रशांत माने, बाळासाहेब बारगजे, समीर होडबे, रविंद्र पाटील, मनिषा पवनारकर, दिप्ती गावंड, स्मिता नवघरे, पुजा शहा, संगीता कांबळे, परीणीता मिंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

● अलिबागमध्ये ब्लॉक व दुकानाचे गाळे भाड्याने देणे आहे. संपर्क : मोबाईल ९८२२०३१०१७/९०२८५६५९१७

● गाळा भाड्याने देणे आहे. साबू हॉस्पिटल बिल्डींग पी.एन.पी.मध्ये गाळा नं.१६ कलावती भाजी भंडारच्या बाजूला contact No. 7304852315/9604138826

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रानमेवा मिळविण्यासाठी जीवघेणी धडपड

## ■ उन्हाळ्यातील एकमेव उदरनिर्वाहाचे साधन

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**
**जंगलातील तयार झालेला रानमेवा बाजारपेठेत येत असला तरी सुद्धा हा रानमेवा काढण्यासाठी जिवघेणी धडपड करावी लागत आहे. रस्त्यालगत जांभूळ, कैऱ्या तसेच करवंदे अशी विविध झाडे असून या झाडावर आलेली फळे काढताना वाहानांमुळे अपघात होण्याचा धोका मोठ्या प्रमाणावर संभवत आहे. मात्र, पोटाची खळगी भरण्यासाठी ही जिवघेणी धडपड करावी लागत असल्याचे आदिवासी बांधवांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.**





रणरणत्या उन्हामध्ये रानमेवा तयार झाल्यामुळे आदिवासी बांधावांना रोजगार मिळत आहे. यामुळे रोजच्या दैनंदिन व्यवहारात आर्थिकची समस्या मार्गी लागत आहेत. उन्हाळ्यात आलेला रानमेव्यामुळे आदिवासी बांधवांचा उदरनिर्वाह होत आहे. यामुळे निसर्गातील तयार होत असलेली फळे आदिवासींसाठी मोठा दिलासा देत आहेत.

उन्हाळा सुरु झाला की हाताशी काही काम मिळत नसल्यामुळे जंगलात निर्माण होत असलेला रानमेव्याने आदिवासींचे उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करून दिले आहे. दोन महिने जणू या बांधवांसाठी हक्काचा रोजगार मिळत आहे. जंगलामध्ये तसेच रस्त्यालगत असलेल्या वृक्षांवर आलेली फळे काढण्यासाठी घरातील सर्वच सदस्य एकत्र जमा होत असतात. रस्त्यावर वेगाने येत असलेल्या वाहनांची परवा न करता आपल्याला मोठ्याप्रमाणावर हा रानमेवा कसा मिळेल, हाच विचार आदिवासी बांधवांच्या मनामध्ये रेंगाळत असतो. मात्र, कधी-कधी हाच रोजगार त्यांच्या जिवावर उठत आहे.

### संत श्री बाळूमामा उत्सव

**। खोपोली । प्रतिनिधी ।**
अखंड भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या संत श्री बाळूमामा देवाच्या उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून हा उत्सव दि.२२ व २३ एप्रिल या दोन दिवस लोणावळा येथील पांगोळी धनगरवस्ती येथे आयोजित करण्यात आला आहे.



पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी पागोळी लोणावळा येथे संत श्री बाळूमामाच्या देवाचे भव्य मंदिर असून दररोज लाखो भाविक भक्त येथे येत असतात. दरवर्षी मोठ्या उत्साहात हा उत्सव साजरा करण्यात येतो. त्याचप्रमाणे या वर्षी दोन दिवस या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी (दि.२२) सायंकाळी ४ वाजता भजन, ६ वाजता संजीवनी शिंगाडे यांचे कीर्तन, ७ वाजता महाआरती, ९ वाजता महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रम तर, मंगळवारी (दि.२३) सकाळी ६ वाजता अभिषेक, ७:३० वाजता महाआरती, ९ वाजता महापूजा, १० वाजता भजन, १२ वाजता होमहवन, सायंकाळी ४ वाजता श्रींची भव्य पालखी मिरवणूक, ७:३० वाजता महाआरती, ८ वाजता श्रींची भाकनूक, ९:३० वाजता महाप्रसाद असे आयोजन करण्यात आले आहे.

या संत श्री बाळूमामा देवाच्या उत्सावाला सर्व भाविक भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संत श्री बाळूमामा देवस्थान ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त तथा माजी आदर्श सरपंच बबन खरात यांनी केले आहे.

# कलिंगड, काकडी, उस, कोकम, लिंबूला अच्छे दिन

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

उन्हाची काहिली वाढत आहे. त्यामुळे शरीराला थंडावा देणाऱ्या कलिंगड, लिंबू, उस आणि काकडीला मागणी वाढत आहे. याशिवाय लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. वेगवेगळ्या ठिकाणी प्रचार सभा व कार्यकर्त्यांच्या बैठका होत आहेत. अशावेळी कार्यकर्त्यांना उन्हाच्या काहिलीपासून थंडावा देण्यासाठी लिंबू व कोकम सरबत, उसाचा रस, कलिंगड आदींचा सहारा मिळत आहे.



निसर्गाचे देण असलेले कलिंगड, लिंबु सरबत, उसाचा रस आणि काकडी हे उष्मा घालविण्यासाठी सर्वांसाठी सर्वात सोपा व स्वस्त पर्याय आणि आधार आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी २० ते २५ टक्क्यांनी भाव वाढले आहेत.

रायगड जिल्ह्यासह नाशिक व इतर ठिकाणावरील कलिंगड जिल्ह्यात विक्रीसाठी येत आहेत. लिंबाची आवक घटली आहे. त्यामुळे त्यांचेही भाव वधारले आहेत. कोकम व काकडीचे भाव वधारले आहे. मागील वर्षी पेक्षा यावर्षी कलिंगडामध्ये २० ते २५ रुपयांनी वाढ झाली आहे. तर एका मोठ्या काकडीमागे पाच ते १० रुपयांनी वाढ झाली आहे.

उसाचे दरही शेकड्यामागे १०० रुपयांनी वाढले आहेत. परिणामी उष्म्यापासुन बचाव करण्यासाठी आता नैसर्गिक पर्याय सोडुन कृत्रिम पर्याय निवडत आहेत. त्यामध्ये बंद बाटलीतील सरबते आणि, प्लास्टिकच्या पाऊचमध्ये मिळणारी सरबत यांना मागणी वाढत आहे.

# नागेवाडीत पोहचले पाणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नागेवाडीमध्ये पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले होते. तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणारी विहिर अटली असून ग्रामस्थांना वाडीपासून चार किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत होते. मात्र, सामाजिक कार्यकर्ते भास्कर दिसले यांनी आदिवासी ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची समस्या बोअरवेल खोदून कायमची सोडवली आहे.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक




# अंजली धारसे, अर्जुन पाटील सेवानिवृत्त

**। माणगाव । वार्ताहर ।**

तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित अभिनव ज्ञानमंदिरउसर खुर्द विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अंजली धारसे व सहाय्यक शिक्षक अर्जुन पाटील यांचा सेवानिवृत्ती पर शुभेच्छा कार्यक्रम रविवार (दि. १४) अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द विद्यालयात संपन्न झाला. अंजली विजय धारसे या ३३ वर्ष शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून मराठी, संस्कृत विषयाचे त्यांनी अध्यापन केले.एक अष्टपैलू शिक्षिका म्हणून तर अर्जुन पाटील यांची २५ वर्ष सेवा झाली असून इंग्रजी विषयाचे ते अध्यापन करीत विद्यर्थ्यांचे प्रिय शिक्षक म्हणून ते प्रसिद्ध आहेत. ३१ मे २०२४ रोजी दोन्हीही शिक्षक नियत वयोमानानुसार ते सेवानिवृत्त होणार आहेत. या शुभेच्छापर कार्यक्रमात किशोर अल्हाट, कृष्णा महाडिक, नागनाथ सुर्वे, दिलीप ढाकणे, ए.आर. कुशिरे, बी. जी. दुधाळ, पंचक्रोशीतील ग्रामस्थ छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणच्या विविध शाळातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोकण ज्ञानपीठात राष्ट्रीय परिषद

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील वाणिज्य विभाग, अकाउंटिंग अँड फायनान्स विभाग व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने रोल ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड मॅनेजमेंट इन असेलेरेटिंग क्रिएटिव्ह इकॉनोमी या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी देशातल्या विविध राज्यातून अनेक संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक यांनी सहभाग नोंदवला. परिषदेचे प्रास्ताविक परिषदेचे संयोजक प्रा. व्हि. एस. इंदुलकर यांनी केले. स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए.शामा यांनी केले. डॉ. सुरेश मैंद, डॉ. एच. के.सिंग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पराग कारुलकर यांनी केले. तर आभार प्रा.रियाज पठाण यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद.
गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार,
माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या-
कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स,
परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी
प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## महावितरण — जाहीर निवेदन

गोरेगाव विभागांतर्गत महाड व पोलादपूर तालुक्यातील महापारेषण कंपनीच्या २२०/२२ केव्ही उपकेंद्रामधून निघणाऱ्या २२ केव्ही वीज वाहिनीची पावसाळ्या पूर्वीची देखभाल दुरुस्तीचे कामे करण्याकरिता दिनांक १६.०४.२०२४ रोजी खालील नमूद २२ केव्ही वीज वाहिनी बंद करण्यात येणार आहेत. तरी महाड व पोलादपूर तालुक्यातील सर्व वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी.

| वीज वाहिनी/फिडरचे नाव | वेळ | बाधित होणारे क्षेत्र |
|---|---|---|
| १. २२ केव्ही बिरवाडी वाहिनी | -०९.०० ते १४.०० | -बिरवाडी, वरंध ता. महाड |
| २. २२ केव्ही पोलादपूर शहर वाहिनी (तुर्भे स्वीचिंग) | -१४.३० ते १८.०० | - पोलादपूर पूर्ण उपविभाग |
| ३. २२ केव्ही एम.आय. डी.सी. ग्रामीण वाहिनी | -१४.३० ते १८.०० | - जिते, टेमघर, खैरे व इतर गावे |
| ४. २२ केव्ही एम.आय. डी.सी. १ वाहिनी | -०९.०० ते १४.०० | - एम.आय.डी.सी. महाड |
| ५. २२ केव्ही एम.आय. डी.सी. २ वाहिनी | -०९.०० ते १४.०० | - एम.आय.डी.सी. महाड |
| ६. २२ केव्ही जीबीएल वाहिनी | -१०.०० ते १४.०० | - जी बीएल उपकेंद्र, MIDC महाड |

**कार्यकारी अभियंता**
**महावितरण गोरेगाव विभाग**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझ्या आशिलांनी खालील वर्णनाची मौजे. कुरुळ, तालुका- अलिबाग जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक **१) श्रीमती. सुजाता प्रभाकर गोंधळी २) कु. सुरज प्रभाकर गोंधळी ३) कुमारी. श्रुती प्रभाकर गोंधळी** सर्व रा. कुरुळ ता. अलिबाग यांच्या मालकी हक्कात व ताबेकब्जात असलेली सामाईक मिळकतीतील त्यांचा असलेला अविभाज्य हिस्सा ही जमीन मिळकत आमच्या आशिलास विकत देण्याचे ठरविले असून त्या आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांनी आमच्या आशिलांना लिहून दिलेला आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| कुरुळ | २ | | ०.५७.०० पैकी ०.२८.५० हे.आर | ११.८० |

सदर जमीनीचे वर नमुद विद्यमान मालक हे आमच्या आशिलाच्या नकळत सदरची जमिन मिळकत अन्य त्रयस्त इसमास विकण्याचा प्रयत्न करीत आहेत असे आम्हाला दि. ०१/०४/२०२४ रोजीच्या कृषीवल वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीसीमार्फत समजले आहे. तरी सदर मिळकतीचे वरील विद्यमान मालक यांनी त्यांचा अविभाज्य हिस्सा दिनांक ०४/०७/२०२३ रोजी साठेकराराने आमच्या अशिलास विकत देणेबाबतचा करार केलेला आहे व तशा आशयाचा साठेकरार त्यांनी आमच्या अशिलास नोटरी नोंदणीकृत करुन दिलेला आहे व त्यावेळेस आमच्या अशिलाकडून रक्कम रुपये ७,००,०००/- (सात लाख रुपये) चेक स्वरुपात स्विकारलेली आहे.

तरी वरील विद्यमान मालकांबरोबर कोणीही त्यांच्या अविभाज्य हिस्सा मिळकतीशी कोणीही कोणताही प्रकारचा खरेदी विक्री करार करु नये तसे केल्यास ते प्रामाणिक खरेदीदार होणार नाहीत तरी या नोटीसीद्वारे सर्वांना कळविण्यात येत की, वरील मिळकतीचा विद्यमान मालकांनी आमच्या आशिलांबरोबर केलेला व्यवहार लक्षात घेता ठरलेल्या किमतीत हा व्यवहार पूर्ण करण्यास आमचे आशिल समर्थ आहोत. तरी अन्य कोणीही सदर विद्यमान मालकांशी खरेदी विक्री व्यवहार केल्यास त्यांच्यावर कायदेशीर दिवाणी व फौजदारी कारवाई करण्यात येईल. हे सर्वांस कळावे

अलिबाग
तारीख - १५/०४/२०२४ **अ‍ॅड. प्रदिप गोरखनाथ तांडेल**
ओम.निवास बंगला स्वामी समर्थ नगर पिंपळभाट
ता. अलिबाग जि. रायगड

## जाहीर नोटीस

**(मौजे खालापूर येथील सर्व्हे नं.३०/१, ३१/० व ३२/१)**

सर्व सामान्य जनतेस व हितसंबंधितास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्री. सिद्दीक अब्दूल कादर शेख यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सुचित करण्यात येते की,

श्री. बिहारीसरन बाबूलाल खंडेलवाल यांच्या मालकी हक्क व कब्जेताब्यातील मौजे खालापूर येथील नगर परिषद हद्दीतील परिशिष्टातील मिळकतीपैकी जुना मुंबई-पुणे महामार्ग क्रं.४ करीता संपादन झालेले क्षेत्र वगळता बाकी राहिलेले क्षेत्र हे 'जसे आहे, जिथे आहे' या तत्त्वावर हॉटेल व्यवसाय विकसनाकामी देण्याचे निश्चित करून त्या अनुषंगाने सदरची मिळकत ही पुर्णतः निर्दोष व निजोखिम असल्याचा विश्वास श्री.बिहारीसरण बाबूलाल खंडेलवाल व त्यांचे काळजीवाहू श्री.अन्वर काजी यांनी माझे पक्षकारास दिलेला असून तसा नोंदणीकृत करारनामा करून देण्याचे ठरलेले आहे. तरी परिशिष्टातील नमूद मिळकती विषयी कोणत्याही व्यक्ती वा संस्थांचे कोणत्याही स्वरूपाचे जसे की, चोळी बांगळी, गहाण, तारण साठेखत करारनामा, विक्री, करारनामा, विकसन करारनामा, बक्षीसपत्र, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, लिज, विक्री, इसार अथवा ताबा पावती इतर व अशा स्वरूपाचे तत्सम कोणत्याही स्वरूपाचा उजर/आक्षेप असल्यास त्यांनी सदरील जाहीर नोटीस प्रगटन प्रसिद्धीपासून १५ दिवसाच्या आत मुळ कागदपत्रासह अथवा नक्कल प्रतिसह आपला उजर/आक्षेप लेखी स्वरूपात कागदपत्रासह माझे कार्यालयात मुदतीत नोंदवावा. मुदतबाह्य आक्षेप/उजर ग्राह्य धरला जाणार नाही. तसेच परिशिष्टातील मिळकती विषयी वर नमूद प्रमाणे कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी उजर/आक्षेप न नोंदवल्यास तो स्वइच्छेने व हेतुपुरस्पर सोडून दिल्याचे गृहित धरून माझे पक्षकार पुढील व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ठ**
**मौजे खालापूर नगरपरिषद हद्दीतील ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद प्रमाणे व चतु:सिमेतील मिळकती**

| क्र. | सर्व्हे नं | क्षेत्र | संपादित क्षेत्र | उर्वरित क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३०/१ | ०-३४-० | ०-५-५ | ०-२८-५ | ० रू २८पैसे |
| २ | ३१/० | ०-५७-७ | ०-२२-५ | ०-३५-२ | ६ रू १२ पैसे |
| ३ | ३२/१ | ३-४०-० | ०-१४-० | ३-२६-० | २ रू १९ पैसे |

पुर्वेस : सर्व्हे नं.३० चा हिस्सा व श्री.चंदाणी यांची दगडाची खान
पश्चिमेस : फॉरेस्ट दक्षिणेस :- जुना मुंबई-पुणे महामार्ग क्रं.४
उत्तरेस : फॉरेस्ट सबब ही जाहीर नोटीस
दिनांक : १४/०४/२०२४ सही/-
ठिकाण : खालापूर **अ‍ॅड.काशिनाथ डी.शिंदे**
पत्ता : C/o.श्री. तुकाराम नथू पाटील, मु.लोणवली, पो.चिखले,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६, मो.९३२५२०५३०८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक रुबाबवाई अब्दुल तैयाव यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :- मौजे -मोठे वेणगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ६७/१ | ०-३९-०० हे आर पॉ | ६-६९ |
| ६७/५ | ०-३२-०० हे आर पॉ यापैकी ०-२१-०० हे.आर.पॉ एवढे क्षेत्र | ५-७५ |
| ६८/१ | १०-३८-०० हे आर पॉ | १-१२ |
| ६८/२ | ०-३३-०० हे आर पॉ | ०-४० |
| ६८/६ | ०-२१-०० हे आर पॉ | ०-२८ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १६/०४/२०२४

**अ‍ॅड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**अ‍ॅड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ९९२२१२४८५२
**ऑफिस पत्ता-** शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी शिवदर्शन फलोदयान सहकारी संस्था मर्यादित यातील असलेले प्लॉट नं १६ या मिळकतीचे मालक स्नेहल सोलेगावकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - मांडवणे, तालुका - कर्जत, जि.- रायगड येथील प्लॉट मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं | क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|
| स्नेहल कृष्णकन्हैया सोलेगावकर | १४२ | १६ | ३९८८ |
| | | | एकूण क्षेत्र ३९८८ |

सदरची प्लॉट मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील प्लॉट मिळकत ही तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे अ‍ॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे आशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १६/०४/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**अ‍ॅड. तनिष्का यतिन आहिर**
पत्ता. आहिर निवास, गारपोली,
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८४४६५५२४६८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री. अजित शेषमल ओसवाल व इतर ५ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे: मौजे वदप, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| भूमापन क्रं व उपविभाग / सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ८/२ | ०-६६-५० हे आर पॉ | १२-२५ |
| ८/४ | ०-३७-४० हे आर पॉ | ६-५० |
| ७/४ | ०-३७-४० हे आर पॉ | ६-८७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १६/०४/२०२४

**अ‍ॅड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**अ‍ॅड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ९९२२१२४८५२
**ऑफिस पत्ता-** शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत ही जमिनीचे मालक लिलाधर नारायण म्हात्रे, गीता बाळाराम मोरे, श्वेताली किशोर भोईर, शकुंतला विठोबा म्हात्रे, वसंत नारायण म्हात्रे, सुनिल नारायण म्हात्रे, विनायक गणपत कोठेकर, प्रेमनाथ गणपत कोठेकर, जनार्दन गणपत कोठेकर, विलास गणपत कोठेकर, रविंद्र गणपत कोठेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले असून तशी कार्यवाही आमचे अशिल यांनी जमिन मालकाबरोबर केली आहे.

**मिळकतीचे वर्णन-** जिल्हा व तुकडी रायगड, तालूका व पोटतुकडी पेण, तलाठी सजा वडखळ हद्दीतील मौजे कोलवे येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत.

| सर्व्हे नं. | क्षेत्र १/४ हे.आर.१/२ | आकार १/४ रू.पै. १/२ |
|---|---|---|
| ५७/२ | ०-४८-५० | ६.३४ |

या मिळकतीपैकी अनिल विनायक म्हात्रे यांच्या हिश्याचे क्षेत्र हे.आर. ०-२४-२५ ही मिळकत सोडून उर्वरित क्षेत्र हे.आर. ०-२४-२५

सदरचे मिळकती बाबत दुसरे कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास व सदरची मिळकत कोणासही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लीज, लिन, पोटगी, जामिनकी, कुळहक्क, भाडेपट्टा, पोटगी इत्यादी दिलेले असल्यास त्याबाबत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह नोंदवावी. सदरचे मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचे मिळकतचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

पेण
तारीख- १६/०४/२०२४

सही
**अ‍ॅड. राहूल गजानन पेढवी**
अ‍ॅडव्होकेट
रा. डोलवी, ता.पेण, जि.रायगड
मो.नं. ७२७६४३४८१०

## जाहीर नोटीस

नोटीस देण्यात येते की, माझे अशिल केतन धनसुखलाल ठकरार, खालील मिळकत विक्री करणार आहेत, जी बोजाविरहीत आहे. कोणाही व्यक्तीला सदरील मिळकती बाबत किंवा तिच्या शेअर बाबत जसे विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षिस, डीकी, ताबा, कोर्ट डीकी किंवा अन्य मार्गाने काही हक्क वा दावा असल्यास आपल्याकडील कागदोपत्री पुराव्यासह निम्नसाक्षांकित यांना त्यांच्या कार्यालयात :

अ‍ॅड. अशोक पालु डुकरे
वकील उच्च न्यायालय
रुम नंबर १०१, तळ मजला, प्रभात दर्शन अपार्टमेंट,
तिवळे रेस्टॉरन्टच्या मागे, ममदापुर रोड, खांदा, नेरळ- ४१०१०१,
तालुका कर्जत, जिल्हा रायगड.

सदरील नोटीसीच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत भेटावे, अन्यथा सदरील मिळकती बाबत कुणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून सदरील मिळकत बोजाविरहीत आणि विक्रीयोग्य असल्याचे मी प्रमाणित करीत असून सदरील मिळकतीचा विक्रीचा पुढील व्यवहार करण्याचे मी जाहीर करीत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे नेरळ, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील शेतजमिन.

| सर्वे नंबर | हिस्सा नंबर/ प्लॉट नंबर | क्षेत्र चौ. मीटर | आकारणी रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ३७१ | ४ | ३०५.८० | ३०.५८ |
| ३७१ | ५ | ३०४ | ३०.४० |
| ३७१ | ६ | २९०.९० | २९.०९ |

दिनांक : १०/०४/२०२४

**अ‍ॅड. अशोक पालु डुकरे**
वकील उच्च न्यायालय

## जाहीर नोटीस

दिनांक : १६ एप्रिल २०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे बांगरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| अजय मधुकर ठाणेकर | ७९ | ६ | २-१५-५० | ५-५७ |

यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेल क्षेत्र १-७८-०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, **अ‍ॅड. भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, दिनांक :- १६/०४/२०२४
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ मो. नं. ९१५८२७७७२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकती व त्या मिळकतीमध्ये असलेल्या घर मिळकतीचे विद्यमान मालक १. श्रीमती रेश्मा रमेश म्हात्रे २. श्री. विनीत रमेश म्हात्रे दोघे रा. अधिकारी आळी, चौल, पो. चौल, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या नांवे असलेली बिनशेती मिळकत माझे स्नेही श्री. अभिषेक अजित पाटील. फ्लॅट नं. २७०३, लवेंडर को. ऑप. हौ. सोसा., बिल्डींग नं. १८, एव्हरेस्ट वर्ल्ड, ढोकाली, कोलशेत रोड, ठाणे ४०० ६०७ यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | जु.स.नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | २४१२ | - | ५-३०-०० | ५३.०० |

**वर नमूद बिनशेती मिळकत व या मिळकतीमधील ग्रुप ग्रामपंचायत चौल घर क्र.१०३७ या घर मिळकतीसह**

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०४/२०२४ सही /-
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा. थेरोंडा ( धाकलीवाडी), पो. चौल
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड, गट नं. १४९, क्षेत्र ०-२३-०० हे. आर. पो. ख. ०-१९-०० हे. आर. एकूण क्षेत्र ०-४२-०० हे. आर., आकार ३.३५ रू. पै. ही मिळकत (तद्नंतर सदर जाहीर नोटीशीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विश्वनाथ कृष्णा पेढवी रा. मु. नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत आमच्या अशीलांनी खरेदी करण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, **(अ‍ॅड. संजय द. म्हात्रे)**
तारीख : १५/०४/२०२४ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,
ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

दिनांक १६/४/२०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. वरुण देवेंद्रनाथ बाजपयी व आरथी वरुण बाजपयी (पूर्वाश्रमीची आरथी रामकृष्णन) रा.मुंबई यांच्या सामाईक मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेल्या मिळकती माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग क्र. | | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. टेकाळी | ४९ | | ०-१६-७० | ३.१२ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-००-५० | |
| | | एकूण | ०-१७-२० | |
| २. टेकाळी | ५० | | ०-१४-१० | ३.३१ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-०१-३० | |
| | | एकूण | ०-१५-४० | |
| ३. टेकाळी | २७७/२ | | ०-२३-७० | २.४५ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-०२-७० | |
| | | एकूण | ०-२६-४० | |
| अनुक्रमांक ३ कडील मिळकतीपैकी ०-०५-६० हे. आर. मिळकत | | | | |
| ४. टेकाळी | ५२ | | ०-१२-१० | २.७५ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-०१-०० | |
| | | एकूण | ०-१३-१० | |
| अनुक्रमांक ४ कडील मिळकतीपैकी ०-०६-५० हे.आर. मिळकत | | | | |
| **मौजे** | **भूमापन क्र.व उपविभाग क्र.** | | **क्षेत्र (हे.आर.)** | **आकार (रु.पै.)** |
| ५. टेकाळी | ५३ | | ००-७६-२० | १२.१२ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ००-०४-४० | |
| | | एकूण | ००-८०-६० | |
| ६. टेकाळी | ५५ | | ०९-५०-०० | ९५.०० |
| ता. अलिबाग | | | | |

अनुक्रमांक ५ व ६ कडील बिनशेती मिळकती व या मिळकतीमधील ग्रुप ग्रामपंचायत आवास घर क्र. १३४९, १३५० व १३५१

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक १६/०४/२०२४ सही /-
**अ‍ॅड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## निवडक

### सुभाष कंगरलकर यांचे निधन

**पणजी:** गोव्याचे माजी रणजी कर्णधार सुभाष कंगरलकर यांचे सोमवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. यावेळी ते ७२ वर्षांचे होते. मूळ बेळगाव येथील कंगरलकर सध्या वास्को येथे स्थायिक होते. बेळगाव येथेच त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सुभाष कंगरलकर ८० च्या दशकातील अष्टपैलू क्रिकेटपटू होते. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्यांनी ३० पेक्षा अधिक सामने गोव्यासाठी खेळले असून, १ हजारपेक्षा जास्त धावा त्यांनी केल्या आहेत.

### रमणदीप बनला सुपरमॅन!

**नवी दिल्ली :** आयपीएल हंगामातील २८वा सामना कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात कोलकाताच्या ऐतिहासिक ईडन गार्डन स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात केकेआरचा युवा खेळाडू रमणदीप सिंगनं एक शानदार झेल घेतला, ज्याचं आता सर्वत्र कौतुक होत आहे. रमणदीप सिंगनं दीपक हुडाचा झेल घेतला. हा झेल पाहून केकेआरचा मालक शाहरुख खानही खूप प्रभावित झाला आहे.

### रोहितचे ५०० षटकार

**मुंबई :** मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज आमनेसामने होते. २०७ धावांचं मोठं लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या मुंबईनं फलंदाजीला आक्रमक सुरुवात केली. सलामीवीर रोहित शर्मानं सुरुवातीपासूनच आपले इरादे स्पष्ट केले. त्यानं सीएसकेच्या गोलंदाजांना मोठे फटके हाणायला सुरुवात केली. रोहित शर्मानं चेन्नई विरुद्धच्या खेळीत ३ षटकार लगावताच इतिहास रचला. तो टी-२० क्रिकेटमध्ये ५०० षटकार मारणारा पहिला भारतीय खेळाडू बनला आहे.

### धोनीनं हार्दिकला धुतलं

**मुंबई :** वानखेडे स्टेडियमवर मुंबई विरुद्ध चेन्नई सामन्यात पुन्हा एकदा महेंद्रसिंह धोनीचा जुना अवतार पाहायला मिळाला. थालानं शेवटच्या षटकात फलंदाजीला येऊन हार्दिक पांड्याच्या ३ चेंडूंवर सलग ३ षटकार ठोकले. धोनी ४ चेंडूत २० धावा करून नाबाद परतला. हार्दिक पांड्याच्या या शेवटच्या षटकात २६ धावा निघाल्या. त्यानं ५०० च्या स्ट्राईक रेटनं धावा केल्या. धोनीने येऊन सलग तीन चेंडूंवर तीन षटकार मारत हार्दिक पांड्याची लाईन-लेन्थ बिघडवून टाकली.

### पंतवर बंदीची शक्यता

**नवी दिल्ली :** आयपीएलमधील दिल्ली कॅपिटल्स संघाचा कर्णधार रिषभ पंत मोठ्या अडचणीत सापडला आहे. रिषभ पंतवर बंदीची कारवाई होण्याची शक्यता आहे. कर्णधार रिषभ पंतवर आयपीएलमध्ये एका सामन्यासाठी बंदी घातली जाऊ शकते. रिषभवर यापूर्वीही दोनवेळा दंडात्मक कारवाई करण्यात आली. तिसऱ्यांदा देखील दिल्ली संघाने तीच चूक केली अन् षटकांची गती संथ राखली तर दंडाची रक्कम ३० लाख रुपये होईल.



# रोहितची शतकी खेळी व्यर्थ



- **पथिरानाच्या गोलंदाजीचा प्रभाव**
- **चेन्नईचा मुंबईवर विजय**

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
मुंबई इंडियन्सच्या घरच्या मैदानावर चेन्नईने मुंबईचा २० धावांनी दणदणीत पराभव केला आहे. चेन्नईने दिलेल्या २०७ धावांचा लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईचा संघ ६ बाद १८६ धावाच करू शकला. मुंबईच्या पराभवामुळे रोहित शर्माचे झंझावती शतक व्यर्थ गेले. रोहित शर्माने ६१ चेंडूत १०० धावा केल्या. पण पाथिरानाच्या भेदक गोलंदाजीपुढे मुंबईचे इतर फलंदाज टिकू शकले नाहीत. पाथिरानाने शानदार गोलंदाजी करत चार षटकांत चार विकेट घेतले. सूर्यकुमार यादवला शून्यावर बाद करणं, ही चेन्नईसाठी महत्त्वाची गोष्ट ठरली.

रोहित शर्माने शेवटच्या चेंडूपर्यंत फटकेबाजी करण्याचा प्रयत्न केला, पण चेन्नईचा संघ आणि पाथिरानाची गोलंदाजी मुंबईवर भारी पडली. धोनीच्या अखेरच्या षटकातील ३ षटकारांच्या जोरावर संघाने २०७ धावांचा आकडा गाठला. चेन्नईच्या डावात मुंबईसाठी शेवटचे षटक टाकण्यासाठी आलेल्या हार्दिकच्या षटकात एकूण २६ धावा झाल्या. यातील धोनीने सलग ३ षटकार मारले आणि शेवटच्या चेंडूवर २ धावा केल्या. धोनीमुळेच चेन्नईला २०० धावांचा टप्पा पार करण्यात यश आले. हे शेवटचे षटक मुंबईसाठी चांगलेच भारी पडले.

इशान किशनने रोहितसोबत फलंदाजी करताना चांगली सुरूवात केली पण इशान पाथिराना कडून २३ धावा करत बाद झाला. त्याच षटकात सूर्याही खाते न उघडता बाद झाला. रोहित आणि तिलकने ५० अधिक धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला पण तिलक ३१ धावा करत झेलबाद झाला. पाथिरानाने मुंबईच्या ३ मोठ्या फलंदाजांना बाद केल्याने संघ बॅकफूटवर केला. संघाचा कर्णधार हार्दिक पंड्या २ धावा करत बाद झाला तर डेव्हिडने सलग दोन षटकार लगावत सर्वांच्या आशा पल्लवित केल्या, पण तो ५ चेंडूत १३ धावा केल्या. तर शेफर्डही १ धावा करत क्लीन बोल्ड झाला. सगळे फलंदाज बाद होत असतानाच रोहित शर्मा एका टोकाला पाय रोवून घट्ट उभा होता, पण इतर फलंदाजांची रोहितला साथ न मिळाल्याने त्याने शतक झळकावूनही संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.

तत्पूर्वी नाणेफेक गमावून चेन्नईने प्रथम फलंदाजी करताना २०७ धावा केल्या. चेन्नईने अजिंक्य रहाणे आणि रचिन रवींद्र या जोडीला सलामीसाठी धाडले. पण रहाणे एका चौकारासहित पाच धावा करत बाद झाला. त्यानंतर रचिन रवींद्र १६ चेंडूत २१ धावा करत आऊट झाला. ऋतुराजच्या ६९ धावा आणि सातत्याने फॉर्ममध्ये असलेल्या शिवम दुबेच्या ६६ धावांच्या शानदार फटकेबाजीच्या जोरावर संघाने १५० अधिक धावा केल्या. तर मिचेलनेही १४ चेंडूत १७ धावा केल्या. सुरूवातील मुंबईने धावांवर अंकुश ठेवला खरा पण शेवटपर्यंत तो कायम राखण्यात अपयशी ठरले. त्यानंतर धोनीने ५०० च्या सरासरीने ४ चेंडूत २० धावा करत संघाच्या विजयाचा पाया भक्कम केला.

### अंजू, हर्षिताने आशियाई स्पर्धेत
# रौप्यपदकावर कोरले नाव

**। बिशकेक । वृत्तसंस्था ।**
अंजू व हर्षिता या भारताच्या महिला कुस्तीपटूंनी येथे सुरू असलेल्या आशियाई स्पर्धेमध्ये रौप्यपदकावर नाव कोरले. भारतीय महिला खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये तीन रौप्य व तीन कांस्य अशी एकूण सहा पदके पटकावली.



अंजू हिने ५३ किलो वजनी गटात रौप्यपदक जिंकले. अंतिम फेरीच्या लढतीत तिला उत्तर कोरियाच्या जी किम हिच्याकडून हार पत्करावी लागली. हर्षिताला ७२ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत चीनच्या कियान जियांग हिच्याकडून ५-२ अशा फरकाने पराभवाचा सामना करावा लागला. मनीषा भानवाला हिला ६२ किलो वजनी गटात, तर अंतिम कुंडू हिला ६५ किलो वजनी गटात कांस्यपदक मिळाले.

याआधी राधिका हिने ६८ किलो वजनी गटात रौप्य व शिवानी पवार हिने कांस्यपदकाची माळ आपल्या गळ्यात घातली होती. पुरुष खेळाडूंनी फ्रीस्टाईल प्रकारात तीन पदके पटकावली. उदितने ५७ किलो वजनी गटात रौप्य व अभिमन्यूने ७० किलो वजनी गटात, तसेच विकीने ९७ किलो वजनी गटात कांस्यपदकाची कमाई केली. ग्रीको रोमन प्रकाराच्या लढती सोमवारपासून सुरू होणार आहेत.

### ज्युनियर चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत
# अनय सुपरकिंग्स संघ अंतिम विजयी

**। पोयनाड । वार्ताहर ।**
पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने ज्युनियर वयोगटातील मुलांसाठी लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचं आयोजन रसायनी पाताळगंगा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्सच्या मैदानावर करण्यात आले होते. इंटर अकॅडमी ज्युनियर वयोगटातील चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत पीसीए इंडियन्स, लावास रॉयल्स आणि अनय सुपरकिंग्स अश्या तीन संघांचा स्पर्धेत सहभाग होता. अंतिम सामना लावास रॉयल्स विरुद्ध अनय सुपरकिंग्स संघांमध्ये झाला त्यात अनय सुपरकिंग्स संघाने विजय मिळवत चॅम्पियन्स होण्याचा मान मिळवला आहे.



संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ठ काम गिरी करणाऱ्या रुद्र परदेशी याला मालिकावीर व उत्कृष्ठ गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले,उत्कृष्ठ फलंदाज म्हणून हार्दिक जाधव तर उत्कृष्ठ क्षेत्ररक्षक म्हणून सार्थक भोईर याला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

संपूर्ण स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणून लावास लुब्रिकन्ट्स, सुकाम हॉस्पिटल, स्पोर्ट्स बॉक्स व प्रदीप स्पोर्ट्स यांनी मोलाचे सहकार्य केले. बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सदस्य राजेश पाटील, शंकर दळवी, ॲड.पंकज पंडित, प्रशिक्षक सागर कांबळे, प्रतिक मोहिते, सुमेध कांबळे, पंच संकेश ढोले, आदेश नाईक यांच्या सह खेळाडू व पालक उपस्थित होते.

### पलकचा अचूक लक्ष्यवेध

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
भारताची आशियाई पदकविजेती खेळाडू पलक गुलिया हिने रिओ दी जेनेरियो येथे पार पडलेल्या पॅरिस ऑलिंपिक पात्रता फेरीतील महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात कांस्यपदक पटकावले. या पदकासह तिने भारताला ऑलिंपिक कोटाही मिळवून दिला. भारताने पॅरिस ऑलिंपिकसाठी २०वा कोटा मिळवला आहे.पलकने अंतिम फेरीत २१७.६ गुणांची कमाई करताना कांस्यपदक जिंकले. याआधी झालेल्या पात्रता फेरीत पलक व सेन्यम या भारताच्या नेमबाजांना मोठे यश मिळाले नाही. त्यांना सहाव्या व सातव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

### कॅन्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा
# गुकेशची विदितवर मात

**। टोरंटो । वृत्तसंस्था ।**
विश्रांतीच्या दिवसानंतर दमदार पुनरागमन करताना डी. गुकेशने आठव्या फेरीत भारताच्याच विदित गुजराथीवर मात करत कॅन्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेत पुन्हा संयुक्तरीत्या आघाडी मिळवली. इयान नेपोम्नियाशीला अझरबैजानच्या निजात अबासोवला नमवण्यात अपयश आले. त्यामुळे आता गुकेश आणि नेपोम्नियाशी यांचे समान पाच गुण आहेत. खुल्या विभागातील अन्य भारतीय बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंदने अलिरेझा फिरुझाविरुद्ध बरोबरी नोंदवली.

१७ वर्षीय गुकेशला सातव्या फेरीत फिरुझाकडून पराभव पत्करावा लागला होता. मात्र, आठव्या फेरीत



त्याने अधिक लक्षपूर्वक खेळ करताना नाशिककर विदितला ३८ चालींत पराभूत केले.

गेल्या दोन कॅन्डिडेट्समधील विजेत्या नेपोम्नियाशीला यंदाच्या स्पर्धेत सर्वात खालचे मानांकन असलेल्या अबासोवने बरोबरीत रोखले. अबासोवने पहिल्या फेरीतही नेपोम्नियाशीविरुद्ध बरोबरीची नोंद केली होती. दुसरीकडे, अमेरिकेच्या दोन अनुभवी ग्रँडमास्टर बुद्धिबळपटूंमध्ये झालेल्या आठव्या फेरीच्या लढतीत हिकारू नाकामुराने अग्रमानांकित फॅबियानो कारुआनावर विजय मिळवला. प्रज्ञानंदला पांढऱ्या मोहऱ्यांचा फायदा करून घेता आला नाही आणि त्याला फिरुझाविरुद्ध अर्ध्या गुणावर समाधान मानावे लागले.

आठ फेऱ्यांअंती, गुकेश आणि नेपोम्नियाशी प्रत्येकी पाच गुणांसह संयुक्तरीत्या अग्रस्थानी आहेत. प्रज्ञानंद आणि नाकामुरा त्यांच्यापेक्षा केवळ अर्ध्या गुणाने मागे आहेत. कारुआना चार गुणांसह पाचव्या स्थानी आहे. त्यांच्या खालोखाल विदित (३.५ गुण) सहाव्या, फिरुझा (३) सातव्या आणि अबासोव (२.५) आठव्या स्थानावर आहे.

महिला विभागात, दोन भारतीय ग्रँडमास्टरमध्ये झालेल्या लढतीत अनुभवी कोनेरू हम्पीने पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना आर. वैशालीवर ६३ चालींत मात केली. हम्पीचा यंदाच्या स्पर्धेतील हा पहिला विजय ठरला. त्यामुळे चार गुणांसह ती थेट संयुक्त पाचव्या स्थानी आली आहे. वैशाली २.५ गुणांसह तळाला आहे. सात फेऱ्यांमध्ये अग्रस्थान टिकवून ठेवलेल्या टॅन झोंगीला आठव्या फेरीत चीनच्याच ले टिंगजीकडून हार पत्करावी लागली. त्यामुळे आता झोंगी, टिंगजी आणि अलेक्झांड्रा गोर्याचकिना प्रत्येकी पाच गुणांसह संयुक्तरीत्या अग्रस्थानावर आहेत. सहा फेऱ्या शिल्लक असताना महिला विभागातील चुरस आता वाढली आहे.

### प्रीमियर लीग फुटबॉल
# मँचेस्टर सिटीचा दमदार विजय

**। मँचेस्टर । वृत्तसंस्था ।**
मँचेस्टर सिटीने दुबळ्या ल्युटनवर ५-१ असा दमदार विजय मिळवताना इंग्लिश प्रीमियर लीग फुटबॉलच्या जेतेपदासाठीची चुरस कायम राखली आहे. सिटीचे आता ३२ सामन्यांत ७३ गुण झाले आहेत. त्यांना लिव्हरपूल आणि आर्सेनलकडून आव्हान मिळते आहे.



ल्युटनचा बचावपटू दायकी हाशिओकाकडून झालेल्या स्वयंगोलमुळे सिटीला दुसऱ्याच मिनिटाला आघाडी मिळाली. यानंतर ल्युटनने पूर्वार्धात सिटीला केवळ एका गोलवर रोखले होते. मात्र, उत्तरार्धात सिटीने गोलच्या मिळालेल्या संधी सत्कारणी लावताना मोठा विजय मिळवला. त्यांच्यासाठी माटेओ कोवाचिच, अर्लिंग हालँड , जेरेमी डोकू आणि जोस्को ग्वार्डियोल यांनी गोल केले.

ग्वार्डियोलने आपला गोल ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत केला. ल्युटनचा एकमेव गोल रॉस बार्कलीने ८१व्या मिनिटाला केला होता.अन्य लढतीत, न्यूकॅसलने टॉटनहॅमला पराभवाचा धक्का दिला.

# पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ट्रॅक पर्पल कलरचा

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**
ऑलिम्पिकमधील ट्रॅक यावेळी जांभळ्या रंगाचा असेल. साधारणपणे ट्रॅक लाल रंगात असतो. टोकियो येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतील ट्रॅकचा रंग लाल होता.

माजी ऑलिंपियन आणि पॅरिस ऑलिम्पिकमधील ॲथलेटिक्स स्पर्धेचे प्रभारी एलेन ब्लोंडेल यांनी सांगितले की, ट्रॅक जांभळा रंग देण्याचे कारण म्हणजे जांभळा हा पॅरिस ऑलिम्पिक खेळांच्या रंगांपैकी एक आहे. अलीकडेच ऑलिम्पिक संघटनेने पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी तीन रंगांची निवड केली होती. ज्यामध्ये गुलाबी, निळा आणि जांभळा रंगांचा समावेश होता.



पॅरिस ऑलिम्पिकच्या ॲथलेटिक्स ट्रॅकचे साहित्य इटलीमध्ये तयार करण्यात आले आहे. १९७६ पासून ऑलिम्पिकसाठी ट्रॅक तयार करणाऱ्या मोंडो या कंपनीचा विश्वास आहे की हे ट्रॅक पूर्वीपेक्षा चांगले असतील. त्यामुळे खेळाडूंना त्यांची कामगिरी सुधारण्यास मदत होईल. टोकियो ऑलिम्पिकमध्ये ॲथलेटिक्समध्ये तीन विश्वविक्रम आणि १० ऑलिम्पिक विक्रम झाले. पॅरिस ऑलिम्पिकमधील ॲथलेटिक्स स्पर्धेच्या प्रभारी एलेन ब्लोंडेल यांनी सांगितले की, टोकियोपेक्षा पॅरिसमध्ये अधिक विक्रम केले जातील.पॅरिस ऑलिम्पिक २६ जुलै ते ११ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. टोकियोमध्ये भारताला प्रथमच ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक मिळाले. नीरज चोप्राने ऑलिम्पिक ट्रॅक आणि फील्डमध्ये भालाफेकमध्ये पहिले पदक जिंकले.

### देशमुखांची सून वानखेडेवर

**मुंबई :** बहुतांश कलाकार मुंबईचे रहिवासी असल्याने हे सेलिब्रिटी अनेकदा मुंबई इंडियन्स संघाला सपोर्ट करण्यासाठी वानखेडेवर जातात. देशमुखांची लाडकी सून जिनिलीया आपल्या दोन मुलांसह मॅच पाहण्यासाठी गेली आहे.जिनिलीयाबरोबर तिची दोन्ही मुलं रियान आणि राहील उपस्थित असल्याचं पाहायला मिळत आहे. या दोघांनी मुंबई इंडियन्सची जर्सी परिधान करून हातात मुंबई संघाचे झेंडे पकडले आहे. जिनिलीयाने लाइव्ह मॅचदरम्यानचे काही क्षण आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहेत.

### टी-२० विश्वचषक स्पर्धा
# पंधरा जणांचा असणार संघ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
टी-२० विश्वचषक २०२४ सुरु होण्यासाठी अवघे काही दिवस उरले आहेत. १ जूनपासून अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये टी-२० वर्ल्ड कपचा थरार रंगणार आहे. आणि यासाठी अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाची घोषणा कधी पण केली जाऊ शकते.आयसीसीने संघ घोषित करण्यासाठी १ मे ही तारीख दिली आहे.

कर्णधार रोहित शर्मासह विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव विश्वचषक खेळणार हे जवळपास निश्चित झाले आहे.

#### दोन विकेटकीपर

**ऋषभ पंत आणि संजू सॅमसन हे वर्ल्ड कप संघात असू शकतात. दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंत भीषण अपघातानंतर नुकताच व्यावसायिक क्रिकेटमध्ये परतला आहे. पंतने काही स्फोटक खेळी खेळून फॉर्ममध्ये येण्याची चिन्हे दाखवली आहेत. दुसरीकडे संजू सॅमसनला दुसरा यष्टिरक्षक म्हणून जागा मिळू शकते. संजू सध्याच्या आयपीएल हंगामात राजस्थान रॉयल्ससाठी फलंदाजीत चमकदार कामगिरी करत आहे.**

सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि रिंकू सिंग यांनाही खेळण्याची संधी मिळू शकते.

# करण म्हात्रे ठरला ‘व्हाईस ऑफ रायगड’

**। पेण । प्रतिनिधी ।**
हार्ट बिट करा ओके स्टुडिओ तर्फे घेण्यात आलेल्या व्हाईस ऑफ रायगड स्पर्धेची नुकतीच अंतिम फेरी सौभाग्य ईनच्या लॉन वर पार पडली. या स्पर्धेत एकूण १३८ स्पर्धकांनी भाग घेतला होता. अंतिम फेरीसाठी ३५ स्पर्धक पात्र झाले होते. या ३५ स्पर्धकांमध्ये पेण येथील करण म्हात्रे याने बाजी मारली.

महत्त्वाची बाब म्हणजे करण म्हात्रे याने कोणतेही संगीताचे शिक्षण घेतले नाही. सर्व संगीताचे बारकावे हे तो युटयुबच्या माध्यमातून शिकत आहे. तसेच त्याने युट्युबच्या माध्यमातून गिटार वाजवायला देखील शिकला आहे.




घरची बेताची परिस्थिती असल्याने तो शास्त्र शुध्द संगिताचे धडे त्याला गिरवता आलेले नाही. परंतु संगिताबद्दल असलेली अतोनात आवड त्याला स्वस्थ बसू देत नाही. म्हणून तो युट्युबच्या माध्यमातून गाण्याबरोबर गिटार, बासरी वाजवायला शिकत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे या स्पर्धेमध्ये असणारे स्पर्धक हे शास्त्रशुध्द संगिताचे धडे गिरवत असताना देखील करणने बाजी मारणे हे कौतुकास्पद होते.या स्पर्धेत सोलोमध्ये प्रथम क्रमांक करण म्हात्रे, द्वितीय क्रमांक दिशा पाटील, तृतीय क्रमांक दिव्या तांडेल, डुइटमध्ये प्रथम क्रमांक शलाका पंडीत व जयदास कोलाटकर, द्वितीय क्रमांक प्रमोद झाल्टे व प्रिया वर्तक, तृतीय क्रमांक भावना घारू व जयदास कोलाटकर तर सिनियर सिटीझनमध्ये प्रथम क्रमांक दिपक दास यांनी पारितोषिक पटकाविली. या स्पर्धेचे परिक्षक वॉईस ऑफ किशोर संदीप शहा, प्रविण पवार, मंजुषा कुलकर्णी यांनी केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रिया संधानशिव, किशोर पाटील, प्रिती शिरसाट व हार्टबिट परिवाराने विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संतोष ठाकूर, ज्योती वाघ यांनी केले.

# खार जिमखाना खुली जलतरण स्पर्धा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
खार जिमखानाच्या वतीने आयोजित खुल्या जलतरण स्पर्धेत खार जिमखान्याच्याच निमिष मुळे आणि झारा बक्षी या दोघांनी सर्वोत्तम जलतरणपटूंचा मान मिळविला झारा बक्षी हिने १७ ते ३० वर्षे या वयोगटातील मुलींमध्ये ६ सुवर्णपदके पटकावली तर निमिष मुळे याने ५ सुवर्ण आणि २ रौप्यपदके पटकावली.



- **५०० स्पर्धकांनी घेतला सहभाग**

तब्बल १५ वर्षांच्या खंडानंतर खार जिमखाना जलतरण समिती आणि वीरधवल खाडे आणि ऋजुता खाडे यांच्या गोल्ड स्टँडर्ड परफॉर्मन्स या प्रायोजक कंपनीच्या वतीने खार जिमखाना येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवसांच्या या स्पर्धेत मुंबईतील ३१ क्लबमधील ५०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी विविध वयोगटात आपला सहभाग नोंदविला होता ६ वर्षे या वयोगटापासून ते ६० वर्षावरील अशा विविध वयोगटात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते सर्व वयोगटातील पहिल्या तीन वेजेत्यांना मेडल्स, ट्रॉफी, प्रमाणपत्रे यांसह रोख पारितोषिके देखील प्रदान करण्यात आली सर्वोत्तम जलतरणपटू ठरलेल्या दोघांना प्रत्येकी १० हजाराची रोख रक्कम देण्यात आली.

राष्ट्रीय जलतरणपटू वीरधवल खाडे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, अशा प्रकारच्या स्पर्धा या किती पदके कमावली यापेक्षा आपली स्वतःची कामगिरी किती उंचावली हे पाहण्यासाठीच असतात यश किंवा अपयश कशी पचवायची हे या स्पर्धा शिकवत असतात आणि याच माध्यमातून एक उत्तम माणूस म्हणून घडण्यास मदत होत असते खार जिमखान्याच्या संयुक्त सचिव सारिका जैन यांच्या मते अशा स्पर्धा खेळाडूंना शिस्त आणि अधिक मेहनत करण्याची शिकवण देणाऱ्या असतात, स्पर्धेचे निकाल यासमोर दुय्यम असतात.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आॅर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)